# हाकारा

वर्ष पंधरावे • अंक चौथा
ऑक्टोबर - डिसेंबर १९९४



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**स्फूर्तिस्थान / प्रेरणा :** *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | डॉ. पी. व्ही. सुखात्मे (पद्मभूषण) |
| **उपाध्यक्ष** | : | प्रा. व्ही. जी. पेंढारकर |
| **मुख्य सचिव** | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| **खजिनदार** | : | डॉ. व्ही. एस. कुलकर्णी |
| **सभासद** | : | डॉ. एन. एस. देवधर |
| | : | डॉ. बी. व्ही. भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. एस. जी. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| | अंकाविषयी | | २ |
| १) | गोंडी भाषा | : व्यंकटेश आत्राम | ३ |
| २) | गोंड गोवारी आणि माना | : शैलजा देवगावकर | १३ |
| ३) | चिरंतन रात्र | : आचार्य शं. रा. भिसे | १८ |
| ४) | आदिवासी हस्तकलेचे व्यवसाय | : उत्तमराव सोनवणे | २४ |
| ५) | परधान | : शैलजा देवगावकर | ३४ |
| ६) | माडिया आणि गोंड जमात | : म. रा. बडवे | ३६ |
| ७) | हलबा आणि हलबा कोष्टी | : शैलजा देवगावकर | ३९ |
| ८) | अमरावती जिल्ह्यातील कोरकू | : राम पाथरकर | ४३ |
| | कविता | : भुजंग मेश्राम | ४६ |

वर्ष पंधरावे : अंक -चौथा
ऑक्टोबर-डिसेंबर १९९४

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३८७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
ग. शां. पंडित

**चित्रकार व संपादन सहाय्य**
पुरुषोत्तम आगाशे

**मूल्य रू. १५/-**

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग
५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

**अक्षरजुळणी**
असाईन सिस्टीम्स्
दत्तवाडी, पुणे ३०.

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## या अंकाविषयी....

*'हाकारा' चा हा वर्ष अखेरीचा अंक महाराष्ट्रातील काही आदिवासी जमातींची ओळख करून देणारा आहे. या अंकातून गोंड, माडिया, परधान, कातकरी, कोरकू इत्यादि जमातींच्या जीवन वैशिष्ट्यांची व त्यांच्या संस्कृतीची ओळख होईलच; परंतु आदिवासींचे त्यांच्या प्रादेशिकतेनुसार काही व्यवसाय, हस्तकला व भाषेची सुद्धा माहिती मिळते.*

*हा अंक सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना मार्गदर्शन व सर्वसामान्यांना माहितीपूर्ण ठरणारा आहे. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.*

**- संपादक**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# गोंडी भाषा

- व्यंकटेश आत्राम

''गोंडी ही कोणत्याही एका जातीची किंवा जमातीची भाषा नसून 'गोंड' हा शब्दही खऱ्या अर्थाने जातीवाचक मुळीच नाही. बंगाली भाषा बोलणारे जसे बंगाली जातीचे ठरू शकत नाहीत, किंवा पंजाबी बोलणाऱ्यास आपण जसे त्याची जात पंजाबी आहे असे म्हणू शकत नाही किंवा मराठी बोलणारासुद्धा महाराष्ट्रीयन नायक जातीचा संबोधिला जाऊ शकत नाही. तद्वतच गोंडी बोलणारे लोक गोंड जातीचे ठरू शकत नाहीत. जातीवाचक अर्थाने गोंड ही जातच अस्तित्वात नाही ही वस्तुस्थिती आहे. कारण कोणतीही गोंड नावाने ओळखली जाणारी व्यक्ती स्वत:ला कधीच गोंड जातीचे संबोधित नाही तर ती स्वत:ला कोई किंवा कोईतूर किंवा परधान, ढोली, बुरड, थोटी, सरोती, पाळा, कोयता, माडिया किंवा मुरिया किंवा अशाच वेगळ्या एखाद्या जमातीची असल्याचे मानते.

श्री. व्ही. डब्ल्यू. करमबेलकरांच्या मते ''ही जमात विविध उप-जातींमध्ये (अ) छिंदवाडा, बैतूल, सिवनी आणि मंडला या जिल्ह्यांत व्याप्त आहे. (आ) ती छत्तीसगढ मैदान आणि गोंडवाणाच्या दक्षिण पश्चिमेस कांकेर बस्तर चांद्याकडेही मुबलक संख्येने आहे. हे लोक 'गोंड' या प्रचलित नावाने ओळखले जातात; पण ते आपसात कोई, कोईतूर, खोंड, कोंड, कोरकू आणि कन्ध अशा नावाने संबोधिले जातात. भाषिक आणि जातीय दृष्टीने ते द्रविडीयन लोक होत आणि ते स्वत:स रावण वंशीय असल्याचे मानतात.''

भारतीय एश्नॉलॉजीकल कमिटी, ढेबर कमिशन आणि अनेक विद्वानांचेही मत असेच आहे की ''गोंड नावाखाली अनेक जमातींचे लोक भारतात अस्तित्वात आहेत.'' चंद्रपूरचा इतिहास या ग्रंथाचे लेखक श्री. राजूरकर यांचे मते तर गोंड नावाखाली २०० चे वर जमाती अस्तित्वात आहेत. सारांश हाच की ''गोंड'' हा शब्द जातीवाचक नसून प्रजावाचक आहे. ''गोंडवाणा'' नामक प्रदेशात राहणारे आणि गोंडी भाषा बोलू-समजू शकणारे जे लोक, तेच गोंड लोक होत.

हे जे गोंडी भाषिक लोक आहेत ते नर्मदा ते गोदावरी व सातपुडा विंध्याचलाच्या हजारो मैल पसरलेल्या परिसरात हजारो वर्षापासून वास्तव्य करीत आहेत. ऐनी अकबरीमध्ये त्यांच्या प्रदेशाच्या सीमा (१) पूर्वेस रत्नपूरचे राज्य, (२) पश्चिमेस माळवा, (३) उत्तरेस पन्ना राज्य आणि (४) दक्षिणेस दख्खन याप्रमाणे दर्शविलेल्या आहेत या प्रदेशातील गोंड लोकांना आदिवासी असेही म्हटले जाते. कारण गोंडीभाषिक लोक भारतातील मूळ निवासी मानले जातात. (Aboriginal tribes) यावरून गोंडियनांना "Gone Indians are called Gondians" असे म्हणजे गतकालीन (इंडीयन्स किंवा) भारतीय नागरिक म्हणायला काहीच हरकत नाही. कारण गतकालीन त्यांची संस्कृती समृद्ध होती.

आज भारतात दीड कोटीच्या आसपास गोंडीयन लोकांची संख्या आहे. चार्लस् ग्रँटच्या कथानकानुसार १७८१ साली गोंडवनातील गोंडीयनांची संख्या २० लाख आदिवासी यांपैकी १५ लाखाच्या वर होती. एवढ्या प्रचंड लोकसंख्यायुक्त गोंडीयन समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा प्राचीन संस्कृतीचा आणि प्राचीनतम गोंडी भाषेचा काही पाश्चात्य विद्वान सोडले तर कोणीच वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केलेला नाही, किंवा

गोंडीयनांनाही तसे प्रोत्साहित केले गेले नाही. त्यामुळे मराठी, तेलगू, कानडी आदी भारतीय भाषांचा इतिहास किंवा भाषा विज्ञान जसे शास्त्रशुद्ध पद्धतीने ग्रंथीत करून ठेवण्यात आलेले आहे तसे गोंडी भाषेचे भाषाशास्त्र तयार करण्यात आलेले नाही, किंवा कुठे तसे तयार केले गेले असले तरी आमचेकडे ते उपलब्ध नाही, हे एक दुर्दैव म्हटले पाहिजे. ऑस्ट्रेलियातील एक स्त्री सूजी आंद्रेस भारतात येऊन गोंडीयनांच्या भाषाशास्त्राची रचना करायला लागते. तरीही या २० व्या शतकातील भारतीयाला तत्कार्याची प्रेरणा होऊ नये, ही आश्चर्याची बाब म्हटले पाहिजे. गोंडी भाषेच्या दृष्टीने ही बाब हानिकारक आहे. कारण मराठी, कन्नड, तमीळ आदी भारतीय भाषांच्या जडण घडघडणीच्या कामामध्ये गोंडी भाषेचा केवढा उपयोग झालेला आहे आणि कशा पद्धतीने झालेला आहे याची तीळमात्र जाणीव भाषापंडितांना होऊ शकलेली नाही.

सर्वसाधारणपणे गोंडी भाषा ही द्रविडीयन भाषा समुहात मोडते. अनेक विद्वानांनी गोंडी ही प्राचीन तमीळच होय असे म्हटले आहे. तिची अश्लिष्ट योगात्म अवस्था असून तिच्यात स्वरानुरूपताही दिसून येते. त्यामुळेच द्रविडीयन भाषांचा मोहेंजोदारो हरप्पातील अक्षर शिल्पाशी किंवा त्या भाषेशी संबंध जोडण्यात येतो. असे सांगण्यात येते की, ''प्रागैतिहासिक काळात महासागराच्या खाली कैमुरी महाद्वीप असावी व तेथे द्रविडांची वस्ती असावी. या द्रविडांमध्ये १४ भाषा आहेत. त्या ४ भागांत वर्गीकृत केलेल्या आहेत : (१) द्रविडी भाषा समूह (२) मध्यवर्ती भाषा समूह, (३) आन्ध्र भाषा समूह (तेलगू वगैरे) मध्यवर्ती भाषा समुहात मोडते. मध्यवर्ती भाषा समुहात (I) गोंडी, (II) ओराओ (III) कुई, (IV) कंधी आणि (V) कोलामी या भाषा मोडतात. गोंडी ही प्रमुख मानली जाते.'' (२) या भाषांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "Intermediate languages" असे म्हटलेले आहे.

वरील अवतरणातील ''कैमुरी महाद्वीप'' चा संदर्भ ''कोईमुरी'' या शब्दाशी म्हणजे मारीया गोंडीयनांशी जुळतो आणि हा द्वीप म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून ''गोंडवाना लॅंडस्'' होय. गोंडवाना लॅंडचा सिद्धान्त अंदाजे ८० वर्षे अगोदर ऑस्ट्रेलियाचे तज्ज्ञ जिऑलॉजीस्ट एडवर्ड स्वेस यांनी मांडला आणि पृथ्वीचा दक्षिण गोलार्धातील दक्षिण अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, अंटार्क्टिका आणि भारत या पंचमहाद्विपांच्या सलग भू-भागाला ''गोंडवाना लॅंड'' असे प्राचीन काळापासून संबोधण्यात येते असे प्रतिपादिले. लक्षावधी वर्षापूर्वी हे पंचखंड अखंड स्वरूपात एकत्र होते. त्याच्या उत्तरवर्ती विभागाला म्हणजे पृथ्वीच्या उत्तर गोलार्धाला यूरेशिया म्हणतात असे आजही भूगोल शास्त्रात शिकविले जाते. (३) एडवर्ड स्वेसच्या सिद्धान्ताला रशियाचे भूगोलशास्त्रज्ञ मुऱ्याटोव्ह, ॲग्रॅनॅट, मेंझाबीर इत्यादी विद्वानांनी दुजोरा दिलेला आहे.

(४) भारतीय शास्त्रज्ञांनी सुद्धा त्याच सिद्धान्ताचे आधारे दक्षिण अंटार्क्टिकेवर भारताची मोहिम काढून तो भारताचा म्हणजे गोंडवाना लॅंडचा अविभाज्य भाग असल्याचा दावा करून तेथे भारतीय ध्वज फडकाविला आहे. ही सर्वांच्याच नजरेसमोरील बाब आहे. तेव्हा अचल रंगस्वामी किंवा सुजाता नागराजन (५) यांच्यासारख्या भारतीय विद्वानांच्या मताचा विचार केला तर गोंडीयन समाजाचा निग्रो आदि जागतिक समाजगटांची एकरूपता मान्य करावी लागते अणि गोंडीयनांची व्यापकता फार प्राचीन काळी पृथ्वीच्या दक्षिण गोलार्धापर्यंत पसरल्याचे मान्य करावे लागते. म्हणूनच की काय गोंडीयनांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांमध्ये आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे नामनिर्देशन वारंवार आढळून येते आणि गोंडीयनांची धार्मिक चिन्हे जगभर विखुरलेली आढळून येतात. जसे गोंडीभाषिकांचा धार्मिकदृष्ट्या

पूज्य पुरूष म्हणून गौरविलेला रावण हा जागतिक किर्ती प्राप्त झालेले आद्य दैवत होय. त्याचे संपूर्ण पृथ्वीवर राज्य होते असे गोंडीयनांचे मत आहे. तो जिथे जिथे गेला तिथे तिथे गोंडीयनांच्या आराध्य दैवत लिंगपिंडाची प्रतिस्थापना झालेली आहे.

यत्र यत्र च यातिस्म रावणो राक्षसेश्वर :।
जांबूनदमयं लिंगं तत्र तत्र च नीयते ॥

असे रामायणात तर आढळून येतेच. पण गोंडीयनांच्या लोकगीतांमध्येही आढळून येते. अबूझमाड मधील गोंडी गीताच्या ओळी पहा -

''दामट पेन्डाम पेंडोय राकेस मेटा ।
खोर्क पहेकची वायकोम संगो'' ॥

अर्थात - ''पिन्डम गोत्राच्या मित्रा! राक्षेश्वराने पृथ्वीच्या पहाडांवर तुझे पिन्ड चिन्ह सर्वत्र अंकित केलेले आहे. आपण ती वेचून आणून घेऊ या लाकडे वेचल्याप्रमाणे....''

डॉ. हिरालाल शुक्लांनी या गोंडी ओळीचा वेगळा अर्थ दिलेला आहे. त्यांचे मताप्रमाणे त्या ओळीचा अर्थ - ''आपण संगी! राक्षस पहाडीच्या पायथ्याशी जाऊन खोड आणि इंधन गोळा करून आणू या.'' असा आहे.

गोंडीभाषिकांना त्या ओळीतील ''पेन्डाम पेंडोय'' या दोन शब्दांचा लिंगपिंड हे आपले कुलचिन्ह असणाऱ्या 'पेंडाम' गोत्राचा संदर्भ आठवल्याशिवाय रहात नाही. म्हणून गोंडी भाषेचा उच्च पातळीतून अभ्यास होणे जरूरीचे आहे. गोंडाची ''जंगली जमात'' याच एका पूर्वग्रहातून विचार केल्यास त्या भाषेतील ऐतिहासिक सत्ये पडताळताच येऊ शकणार नाही. त्यामुळे भारतातच नव्हे तर बहुतांशी विदेशांतही जे लिंगपिंडाचे मुबलक अवशेष आढळून येत आहेत त्याचे मुख्य गुह्य कळू शकत नाही. लिंगपिंड किंवा ''लिंगयोनी'' प्रजेची प्राचीन प्रथा आर्य संस्कृतीत किंवा अन्य संस्कृतीमध्ये नाही. सी.व्ही वैद्य म्हणतात, Ram is never spoken of as worshipping a Linga. It is only Ravana who is spoken of as worshipping a Linga, in the उत्तर कांड.

गोंडीयनामध्ये पेंडाम गोत्र आहे. पेंडामचा अर्थ गोंडी भाषेत ''स्त्रीयोनी'' असा आहे. आणि ते गोंड लोक देव स्वरूप मानून पूजनीय मानतात. रावळ देव तर गोंडाच्या अंगामध्येच येत असतो. याचा सर्व संदर्भ लक्षात घेतला तर गोंडीयनांची गोंडी भाषा गोंडवाना लँडच्या निर्मितीपासून म्हणजे लक्षावधी वर्षापूर्वीपासून या भारत खंडात अस्तित्वात आहे असे मानायला हरकत नाही. भारतीय वातावरणाशी हे पडताळून पाहता येते. उदाहरणार्थ, भारतात जेव्हापासून नद्या-पर्वते निर्माण झालेली आहेत, त्यांचे नामकरण येथे प्रथम वास्तव्य करणाऱ्या समाज गटाच्या भाषेतून झालेले आहे. आता पर्वत तयार झालेत. त्यांना 'पर्वत' असे नामभिधान कोणत्या भाषेतून दिले गेले असावे बरे!

गोंडी भाषेत पर्रोवरच्या दिशेने, आणि वात म्हणजे आलेली, आलेला ''वामाळ'' म्हणजे ''येणे'' या क्रियापदाचे भू. धातुसाधित रूप. पर्वत म्हणजे गोंडी भाषेत वर आलेला आहे, असा भू-भाग. अशी व्युत्पत्ती कोणत्याही भाषेत लागत नाही. म्हणून पर्वताच्या निर्मितीपासून गोंडी भाषेचे अस्तित्व मान्य करावे लागले.

याच अर्थाच्या 'मट्टा' या गोंडी शब्दाची विश्व व्यापकताही पडताळता येते. पर्वत शब्दाची व्युत्पत्ती गोंडी भाषेत मिळते, पण पर्वत शब्दापेक्षा 'मट्टा' शब्द गोंडीत अधिक प्रचलित आहे. जागतिक भाषा म्हणविणाऱ्या इंग्रजीमध्ये पर्वताला 'माऊंटेन' हा शब्द आहे आणि तो गोंडीतील ''मट्टांग'' या शब्दापासून म्हणजे ''मट्टाच्या'' अनेक वचनी रूपापासून तयार झालेला नसेल असे कसे म्हणावे!

गोंडी भाषेत 'गाव' शब्दासाठी 'नार' हा शब्द आहे. त्याचे अनेक वचनी रूप 'नारक' किंवा 'नारग' किंवा नाहाक असे होते. मराठीतील 'नगर' शब्द 'नारक' किंवा 'नारग' या गोंडी शब्दापासून आला असल्यास नवल नाही. 'नार' या शब्दापासून देश अर्थाचा नारट-नाट हा शब्द गोंडीत तयार झाला आहे. नाटेन, नाटेने, नाटेनून इत्यादी देशगावात, देशगांवातच, देशगावाना या अर्थाची गोंडी भाषेत अनेक रूपे दिसून येतात ती जागतिक भाषा इंग्रजीतील ''नेटीव्हप्लेस'' आणि 'नेशन' या शब्दांशी सुद्धा तंतोतंत जुळतात.

आजची इंग्रजी निरनिराळ्या ३६ भाषा मिळून बनली आहे असे म्हणतात. अर्थात ३६ भाषांचे शब्द इंग्रजीत मिसळले आहेत. कोणत्याही समाजाच्या मातृभाषेमध्ये वस्तूला एक अथवा दोन शब्द असतात. परंतु इंग्रजी भाषेत एकाच अर्थाने ५/६ शब्द तरी सहज दिसतात. याचे कारण इतर अन्य शब्द इतर अन्य भाषांमधून इंग्रजीत आलेले असतात. अशा प्रकारे इंग्रजीमध्ये अनेक गोंडी भाषेचे शब्द जसेच्या तसे आणि काही स्वरूप बदलून किंवा गोंडीयन मूळ वैशिष्ट्ये कायम ठेवून शिरलेले आहेत. आणि हे तेव्हाच घडलेले आहे, जेव्हा पृथ्वीच्या दक्षिण गोलार्धात कुयवाराजा किंवा ''राव'' राजांचे राज्य विस्तारले गेले होते. हे काही गोंडी-इंग्रजी शब्दांच्या एकरूपतेवरून कळून येईल.

गोंडी भाषेतील 'आंबे' अर्थाचे 'मरकांग' हा शब्द इंग्रजीतील ''मँगोज'' या शब्दाशी एकरूप पावतो. काही शब्दांची नामावली खाली पाहा :-

| **गोंडी** | **इंग्रजी** | **मराठी** |
|---|---|---|
| सेलार | सिस्टर | बहिण |
| टुळीर | डॉटर | मुलगी |
| मरमिंग, मरमिंज | मॅरेज | लग्न |
| नर्काडा | नाईट | रात्री |
| कमेके | काम | शांत |
| उरकीन | युरीन | मूत्र |
| येर-येरटु | वाटर | पाणी |
| सवोलड | सॉल्ट | मीठ |
| मुंजा | मन्की | वानर |
| मेदुकून | मेडिकल | शरीरसंबंधी |
| लाईनो | लाईक | सारखे |
| वात | वॉक | चालत येणे |
| इलकी, इळकी | इल | ताप |
| वडींग, वडीर | वाईंड | वारा |
| पारी | फ्राटरी | गोत्र सोईर |
| जारी | ग्रास | गवत |
| मुरने | मूर | ओसाड प्रदेश, ओसाड पडणे |
| नेंडे | टुडे | आजच |
| मुनेडोर | मँडेटर | म्होरक्या |
| रियोंग | यंग | तरूण, युवक |
| रांगाना | अँग्री | क्रोधीत होणे |
| नेकाना | नॉकींग | ठोठावणे, वाजवणे |
| ऐवाना | ए-वन | चांगले |
| नटकाना | कटींग | कापणे |
| पिंडी, पिंडीर | पावडर | भुकटी, पीठ |
| नूर-नुरूड | हंडरेड | शंभर |
| टेका | टिक | सागवान |
| कुकने | क्वीकली | त्वरीत |
| मनता | रिमेन | असते |
| कलमाळ | क्लेपो(लॅटीन) कालापीज(ग्रीक) | चोरणे |

याप्रमाणे शेकडो कितीतरी इंग्रजी भाषेतील शब्दांशी गोंडी शब्द हे अर्थ आणि उच्चारांनी साम्य पावतात. ही गोष्ट प्राचीन काळी गोंडी भाषाही जगामध्ये विस्तार पावलेली होती आणि गोंडीभाषिकांचा जागतिक स्वरूपाचा व्यवहार प्रस्थापित झालेला होता, याचे द्योतक आहे. त्यामुळे एडवर्ड स्वेसचा सिद्धांत केवळ गृहित कल्पना मानता येत नाही तर त्यास गोंडी भाषेच्या आधाराने त्यातील तथ्यांश व प्राचीनता तपासता येते.

गोंडी भाषेतील शब्दांचा अत्यंत बारकाईने अभ्यास करणारा जर्मन भाषातज्ज्ञ जूल ब्लॉंच याने गोंडी भाषेची ''आंतर राष्ट्रीयता'' शोधून काढण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या अकाली निधनामुळे गोंडी भाषेचे ते अमूल्य कार्य तेथेच राहून गेले.

गोंडी भाषेची प्राचीनता प्रादेशिक पातळीवर तपासताना असे दिसते की, मराठी-कन्नडादी प्रादेशिक भाषांच्या उभारणीमध्ये गोंडी भाषेचा पायाभूत सहभाग झालेला आहे. प्रधान गुरूदत्त आणि प्रा. राजेश्वरय्या यांचे असे स्पष्ट मत आहे की, ''दक्षिण भारतात तमीळ, कन्नड, मल्याळम व तुळू या पंचद्रविड भाषा कोणत्या तरी एका मूल-द्रविड प्राचीन भाषेतून निपजलेल्या आहेत. (७) गोंडी भाषा ही एक मूलद्रविड भाषा होय. कारण द्रविडीयन भाषा लक्षणांशिवाय काही विशेष लक्षणे, आणि ती प्राचीनतादर्शक अशी लक्षणे, केवळ गोंडी भाषेमध्येच आढळून येतात, असे द्रविडीयन भाषातज्ज्ञ डॉ. ग्रन्डर्ट आणि काल्डवेल यांचे मत आहे. (८) ते म्हणतात :- "Gondi possesses a large number of roots which are not found elesewhere, and exibits peculiarities of grammatical structure of such a nature as amply to justify it as a distinct dialect."

द्रविडीयन भाषासमुहातील कोणत्याही भाषेची गोंडी ही अगदी भिन्न वैशिष्ट्ये धारण करणारी एकमेव प्राचीन भाषा आहे. त्यासाठी काल्डवेलने गोंडी भाषेच्या ७ वैय्याकरणिक कसोट्या दर्शविल्या आहेत. यावरूनही गोंडी भाषा ही द्रविडीयन भाषा लक्षणे धारण करूनही द्रविडपूर्व भाषा असल्याचे सांगण्यात येते. (९) आणि द्रविड, आर्य, कुशाण, शक आदी आक्रमणकारी टोळ्यांनी आपली भाषा द्रविड पूर्व (म्हणजेच गोंडीयन्स) प्रजेवर सतत लादली असे दिसते.

अनार्य द्रविडपूर्व गोंडीयनांच्या प्रदेशात प्रवेश करून यात्रा करण्याची आर्यांना हौस होती, हे सर्वाविदित आहेच.

आर्यावर्त समुत्पन्नो द्विजो वा यदि वाद्विज :
कर्मदां सिन्धुपारंच करतोया न लंघयेत ॥
आर्यावर्तमति क्रम्यविना तीर्थक्रियान्दिज :।
आज्ञाचैव तथा पित्रोरैन्दवेन विशुध्यति ॥

(परिभाषाप्रकाश)

नदी, तटवर्ती, प्रेक्षणीय स्थळी जाऊन आर्य मुनी आपले आसन जमवीत असत आणि त्या परिसरातील जनजीवनाचे अवलोकन करीत असत. त्यांच्या भाषाही अवगत करीत असत. त्यामुळे संस्कृतादी प्रगत भाषांमध्ये प्राचीन प्रजेच्या भाषेतील म्हणजे गोंडीतील शेकडो शब्द संस्कृत भाषेत प्राचुर्याने दिसून येतात. संस्कृतातून गोंडीत त्या शब्दांचा शिरकाव झाला, असे आपणास म्हणता येणार नाही. कारण गोंडीयन लोक ती भाषा शिकण्याच्या अवस्थेत किंवा मनस्थितीत कधीच आढळून येत नाहीत. म्हणून संस्कृतमधूनच सर्व भाषा निपजल्या, ही खुळी कल्पना सोडून दिली पाहिजे असे भाषातज्ञ ॲड. प्र. रा. देशमुख आणि भगवानसिंह आदींचे स्पष्ट मत आहे.

श्री. भगवानसिंह म्हणतात की, ''व्यावहारिक विश्लेषणात आपण हे स्वीकारले पाहिजे की, संस्कृत ही कृत्रिम भाषा आहे; जिचा उगम भारतीय तत्कालीन बोलीभाषांमधून झालेला आहे. तेव्हाचे भाषिक लोक सुपठित व साक्षर नव्हते. त्यांची भाषा संस्कृतच्या जवळ होती. पण तद्रुप नव्हती.'' (१०) म्हणून युरोपीय भाषांची

उत्पत्ती क्लासीकी भाषांतून झाली नसून त्या तत्कालीन मूल बोलीची स्वाभाविक विकसित रूपाने पुढे आल्याचे जसे पाश्चात्य लोक मानतात तसेच भारतीय प्राचीन भाषेतून संस्कारित भाषा विकसित झाल्या असे आपण भारतीयांनी सुद्धा मानायला पाहिजे. हे तत्त्व मान्य झाल्यास मूळ भारतीय भाषा म्हणून जी ''गोंडी'' भाषा चर्चिली जात आहे, तीच विकसित भाषांची श्रोतबिंदू ठरते.

गोंडी भाषेचे स्वरूप पाहिल्यावर तीत आद्यावस्थेतील अनेक चिन्हे तशीच असल्याचे आढळून येतात. गद्य साहित्याचा प्रसार पद्यानंतर झाला असे मानतात. गोंडीतील बहुतांश साहित्य पद्यरूपातच आहे आणि गेयता हे पहिले लक्षण गोंडी भाषेमध्ये दिसून येते. गोंडी भाषेत स्त्रीलिंग आणि पुल्लिंग असे दोनच लिंग प्रकार आहेत. त्यातील स्त्रीलिंगी वचनांची प्रचुरता अधिक आहे. स्त्रीप्रकृतीची भाषा म्हणजे ''गोंडी'' असे म्हटले तरी वावगे होणार नाही. मराठीतले सूर्य, चंद्र, पहाड, पर्वत, बैल, रेडा आदी पुल्लिंगी शब्द गोंडीमध्ये स्त्रीलिंगी मानले जातात. तसेच झाड, मूल, औषध, चिन्ह आदी नपुसंक लिंगी सर्व शब्द गोंडीमद्ये स्त्रीलिंगीच मानले जातात. म्हणजे गोंडी भाषा पूर्णत: प्राकृतिक स्वरूपाची आहे, असे आपणास दिसून येते.

शिव सूत्रांमध्ये परिवर्तीत झालेल्या शिवशंकराच्या डमरूचे बोल हेच आद्य भाषांचे मूल स्त्रोत मानण्यात येतात.

जसे -अइउण, ऋलृक्. एओङ, ऐऔच, हयवरट्, लण्, ञमङणनम्, झभञ, धढधष, जबगडदश्, खफछठथ चटतव्, कपय्, शषसर् हल् । या बोलातून नृत्य संगीत आणि गीत सर्जित झाले. गोंड लोक आपल्या कोणत्याही शुभप्रसंगी संगीत आणि गीत गायनाबरोबर नृत्य करणे हे आपल्या शिवशंकराची आराधनाच मानतात. त्याच बोलसूत्रांशी गोंडी भाषेचे अंकोच्चारण सुद्धा साम्य पावते.

जसे -उंड, रऊंडं रंड, मुउंड मुद, नाल उंड, सय उंड सैग, सारूंड, एळ ऊंड एलूंग, अळम ऊंड अळमुंग, उलमुंड पद ॥

जेव्हा गोंडीयन आपला पारंग (ढोल प्रकार) वाजवितो तेव्हा त्याच्या ढोलकीचा आवाज वरीलप्रमाणे काढतो. वरील ढोल सूत्रामधून निघालेल्या ध्वनीतून गोंडी भाषेतील अंक पद्धती निर्माण झाली आहे. गोंडीतील संख्या अंकन असे आहे. १. उंदी; १. रंड; ३. मुंद; ४. नालुंग; ५. सयुंग; ६. सारंग; ७.एळूंग; ८. अळमुंग; ९. लमांग आणि १०. पद. यावरूनच शिवशंकराच्या डमरूतून प्रथम उमटलेल्या प्रतिध्वनीद्वारे सर्वप्रथम गोंडी भाषाच निर्माण झाली नसावी काय?

गोंडी भाषा ही प्राचीन काळीसुद्धा प्रगतावस्थेत पोचली होती आणि हा गोंडीयन समाज अत्यंत वैभवसंपन्न होता, असे त्यांच्या संख्यांकनाचा विचार केल्यावरून वाटते. गोंडी भाषेत 'शंभर' करिता 'नूर' असे म्हटले जाते आणि शून्याकरिता 'गर' असे म्हटले जाते. त्यावरून हाजाराकरिता 'नूरंगार' असा गोंडी शब्द मिळतो. गोंडी भाषेत १०,००० ला पदनुरंगार, लाखास अक्की, १० लाखास अकींगर, कोटीला पुन, दशकोटीस पुंगार म्हणतात.

''सै सैंगर तिर्पता ।
नुर्नुगर दुर्सता ॥

असे धान्य पाखडण्याचे एक कोडे आहे. यात सैं म्हणजे पाच व सैंगर म्हणजे पन्नास असा अर्थ आहे. त्या कोड्याचे मराठी रूप ''पाचपन्नास फेकते । हजार शे लोटटे ॥'' असे आहे.

आर्यांनी सिंधु संस्कृती जाळून नष्ट केली, असे बहुतांश तज्ज्ञांचे एकमत झालेले आहे. त्यांचे बरेचसे चित्रण ऋग्वेदामध्ये स्पष्ट झालेले आहे. ऋग्वेदात गोंडी भाषिकांना ''मृध्रवाच:'' नावाने म्हणजे ज्यांची भाषा अनाकलनीय अशी मुडदाड स्वरूपाची आहे असे

संबोधित असत. गोंडांची भारतात बलाढ्य राज्य व्यवस्था होती व ''कुयवराष्ट्र'' नावाने ते नावारूपास आले होते असे ऋग्वेदातील ऋचा क्रमांक १-१०४-३; १-१०४-४ आदिंमध्ये स्पष्ट सांगितलेले आहे. ''कुयवाराष्ट्रम'' हा शब्दसुद्धा गोंडीयनांच्या ''कुयव नाट्य'' पासूनच संस्कृतकारांनी तयार केला असावा. सी.व्ही. नारायण अय्यर म्हणतात ''कोईल'' म्हणजे देवलोकांची वसती.

"Koyil means house of God is derived from "ka' which means a tree. The purpose now served by the temple was in olden days served only by trees."

वरील पहिल्या वाक्यातील God शब्द Gond असे वाचले तर संपूर्ण आशय गोंडीयनांच्या संदर्भात तंतोतंत लागू पडते आणि कोईल, कुयवनाटम आणि कुयवाराष्ट्री हे शब्द गोंडीयनांच्या प्रभावाची साक्ष देतात.

ऋग्वेदवर्णीत कुलितर व त्याचा पुत्र शंबर हे दस्युराजे गोंड राजे होते. गोंडातील पूज्य पुरूषांना कातोलीर असे म्हणतात व त्यांच्या आराध्य देवतेला 'संभूर सेक' असे म्हणतात. हिंदू लोक त्यास भोळा सांब, भोळा शंकर असे म्हणतात. गोंडीयनांचे 'पेरसापेन्क' हे दैवत ऋग्वेदात ''वृषाकपि'' च्या रूपात आलेले दिसते. गोंडीयनांच्या बऱ्याचशा कल्पना संस्कृत साहित्यात परिवर्तीत झालेल्या आढळतात. त्यावरून सुद्धा गोंडी भाषेचे आद्यत्व आणि प्रभुत्व दिसून येते.

''द्रविडीयन अक्षरवर्ण प्राकृतिक पाली बोलीतील शब्द आणि संस्कृत भाषा यांच्यात जशी चमत्कारिक भेसळ आढळून येते तशीच ही बाब स्पष्ट दर्शविते की, तुरानो-गोंडी-द्रविडीयन-कोलारीयन भाषातील असंख्य शब्दांचे भांडार वैदिक संस्कृतमध्ये सामावलेले आहे. आणि त्यात विलक्षण साम्यही निर्माण झालेले आहे.'' (१४) द्रविडीयन कोई म्हणजे गोंडीयनांच्या धार्मिक कल्पना आणि भाषा साहित्यसुद्धा आर्यांनी स्वीकारून आपल्या संहिता निर्माण केल्याचे डॉ. चटर्जी आणि जयनाथपाती यांचे म्हणणे आहे. ते म्हणतात :- "Therefore, the religion at the Samhita not to Anjans but to aborigines presumably the Dravidian 'KOIS' who are clearly the most important of the realy inhabitants of India." (१५) यावरून संस्कृत ''संहिता'' ह्या गोंडीयन लिटरेचरच्या रूपांतरीत प्रतिकृती होत, असे म्हणता येते. भगवानसिंहानी सुद्धा असे म्हटले आहे की, ''संस्कृत भाषेत २००० धातू आहेत. वेनफिच्या मते ते १७०० आहेत. ज्या धातूची पुष्टी संस्कृत साहित्याचे आधारे होऊ शकत नाही ते धातू भारतीय प्राचीन भाषामधून संस्कृतात घेतलेले आहेत. एजनेरच्या मते संस्कृत साहित्यात ९९२ धातूंचा उपयोग केला जात नाही. ती सर्व धातु रूपे लौकिक भाषातूनच घेतलेली आहेत. पाणीनीच्या वेळचे अनेक तत्सम शब्दांचे अर्थ कात्यायनाच्या वेळी बदलले होते. द्रविडीयन भाषांमध्ये जे भिन्नांतर अर्थ दिसून येतात ते अर्थविचलन नसून अधिक प्राचीन आशयांचे अवशेष होत असे मानायला पाहिजे.''

(१६) संस्कृमधील मीन, नीर, उष्ट्रम आदी शब्द गोंडीतील मासा, पाणी, उंट इत्यादी अर्थाच्या मीन, डेर-येर, हुटुम या शब्दांशी साम्य पावतात. गोंडीतील ''मिण्डाना'' म्हणजे ''पसरणे-पोहणे'' या क्रियापदापासून ''मीण्ड'' म्हणजे जे 'प्रसृत किंवा पोहत आहे' ते 'मीण' म्हणजे मासा हा शब्द तयार झाला. त्याच अर्थाने संस्कृतमध्येही तो आलेला आहे. व्युत्पत्ती मात्र त्या शब्दाची गोंडीतच संयुक्तिक लागते. गोंडीतील प्रचलित शब्द 'येर' किंवा 'डेर' म्हणजे पाणी हा सुद्धा ''नीर'' बनून संस्कृतात गेला. प्राचीन संस्कृतमध्ये 'उष्ट्रम' चा अर्थ 'म्हैस' असा लावला जात होता. आता तो 'उष्ट्र:' म्हणजे उंट असा लावला जातो. गोंडीत मात्र 'हुटूम' म्हणजे 'उंट' अगदी प्राचीन काळापासून तो अस्तित्वात आहे. काल्डवेलने सुद्धा ते शब्द संस्कृतचे

असल्याचे नाकारले आहे. कॉल्डवेल म्हणतो:

"Gondi has mina. It seems much more probable that the Sanskirt speaking people borrowed this word from the Indian aborigines, and then incorporated it in their vocabulary with other words signifying"

संस्कृतातील हेरम्बा म्हणजे म्हैस, मर्कट म्हणजे माकड, एडका हे शब्द गोंडीतून आलेले आहेत. गोंड लोकांत 'एरमे' गोत्राचे लोक म्हशीला कुलचिन्ह मानतात व 'एरमी' असे म्हणतात. ''येर + मई'' म्हणजे ''पाणी + चरते'' तोच शब्द हेरम्बा रूपात संस्कृतात प्रचलित झाला.

'मर्कट', या शब्दात गोंडीतील 'मरा' म्हणजे 'वृक्ष' आणि 'कईट' म्हणजे हात लावणे अशा शब्दांचा 'मराकईट' हा झाड हाताळणे या अर्थाचा अस्सल गोंडी शब्द उत्पन्न झाला. 'एडका' हा गोंडीतील 'एटका' म्हणजे बकरा अर्थाच्या शब्दापासून तयार झाला. 'एटी' म्हणजे बकरी हे सर्वांना माहितच आहे. त्याचे पुल्लिंगी रूप एडका शब्दाने धारण केले आणि संस्कृतात प्रचलित झाले.

संस्कृतमधील ''रिस हिंसायाम'' या धातूचा कधी उपयोग करण्यात येत नाही. ''रिस'' हा शब्द गोंडी भाषेतून क्रोध या अर्थाने आलेला आहे. तो आजही गोंडीत प्रचलित आहे.

तसेच 'रहि गतौ' या धातूचाही संस्कृतात उपयोग नाही. पण 'रोहाना' म्हणजे 'पाठविणे' या अर्थाने तो गोंडीत आजही प्रचलित आहे. कारण ते दोन्ही शब्द गोंडी भाषेतीलच आहेत. काही शब्द गोंडी भाषेतून कसे संस्कृतमध्ये बदलत गेले ते पाहू या:

(१) ग्रीष्म (=उष्मकाल =) गोंडीत कीस =विस्तव उमाना म्हणजे ओढणे. किस + उम्म = किसम्म तो पुढे विस्तव ओढणारा अशा अर्थाने किस्म > ग्रीष्म > ग्रीष्म. अशा रूपात संस्कृतात आला.

(२)उचिष्टे गोंडीत उस्कमाळ म्हणजे थुंकणे. त्यांचे थुंकलेले या अर्थाने

उस्कता + खरकटे > उस्कते + कटे >

उस + कटेऐउस्टे उचिष्टे असे रूप बदलत जाते.

(३) वर्तमान = गोंडीत =वारमाळ म्हणजे गुणगान गाणे + उममाळ म्हणजे ओढून आणणे. = वारती + उम्मान = वार्तुमान + वर्तमान

(४) क्षुद्र > चुड्डूर +लहान

(५) कुंडले = गोंडीत कवि = कान

अंडेल = मणी म्हणजे कानमणी

कवि + अंडले = कुंडले असे रूप.

(६) कृषीवाल + गोंडीत त्यांस कोसराल असे म्हणतात.

(७) परम > = गोंडीत पेरम म्हणजे मोठा

(८) ॐ - गोंडीत वोम म्हणजे ''अंतिम स्थळी घेऊन जा'' असा अर्थ होतो. युद्धामध्ये गोंड लोक शत्रूंना उद्देशून ''वोम, वोम, वोम'' असे जोराने ओरडत असत. आर्य-अनार्यांचे युद्धात आर्य लोकांना ओम म्हणजे ईश्वर उपासना असावी असे वाटले. म्हणून आर्यांनी 'ओम' हे गोंडी क्रियापदॐ या धार्मिक स्वरूपात मढविले आहे.

याशिवाय गोंडीतील इताल = असे; इहून= अशा रीतीने; नांदमाळ = भिजविणे; उचमाळ = उडणे, ताडकमाळ=खाजवणे; दलिमाळ = फाडणे; बोळस्माळ = भाजणे; मोममाळ = विक्री करणे, मुहुचमाळ=भुंकणे; जकमाळ = जाळून मारणे; तारमाळ=पसरणे वारमाळ=आवाज करुन गाणे; अळील=स्तन; अस्कमाळ=कापणे. स्फोट करणे. इत्यादी शेकडो शब्दांना समानार्थी संस्कृत धातू शब्द उदाहरणार्थ अनुक्रमे-इत्थम; एवं. किंवा इव; उन्द्, डी., तुद, किंवा तड्; दल; भ्रस्ज;

मि, मुह; यज्,स्वृ; स्वृ, अरि आणि अस्त्र हे संस्कृत भाषेत आहेत. डॉ. सोहनलाल शर्मांनी तर आपल्या गोंडी भाषेवरील प्रबंधामध्ये शेकडो शब्दांमध्ये संस्कृत आणि गोंडीतील साम्य दर्शविलेले आहे.

गोंडी भाषेतील अनेक शब्द भाषेला आधारभूत ठरलेले आहेत. ही बाब अभ्यासनीय आहे. गोंडीतील ''करीदमाळ'' म्हणजे पवित्र होणे. त्यापासूनच करीत माळ म्हणजे शिक्षण घेणे हे क्रियापद तयार झाले. ''करीतानां'' म्हणजे ''शिकत रहाणे' या गोंडी शब्दापासून ''किर्तन'' हा मराठी शब्द रूढ झाला आहे. गोंडीत 'तेल' करिता 'नीइ' हा शब्द आहे. व त्याचे षष्टीरूप 'नीईदा' असे होते. मराठीत तो शब्द ''स्निग्ध'' अशा स्वरूपात प्रचलित झाला आहे. गोंडीत ''दूध+पिणे'' याकरिता ''पाल + उन '' असे शब्द आहेत. दूध साधारणत: लहान बालक पितात व त्यांचे दुधाने पोषण केले जाते. ''पाल उन '' या गोंडी शब्दापासून पोषण करणे या अर्थाने ''पालन'' हा शब्द रूढ झाला आहे. गोंडीत 'जाळणे' या क्रियापदासाठी ''कल्लुसाना'' हा शब्द आहे. त्यापासून 'जाळ' या अर्थाचा ''कल्लुसा'' हा गोंडी शब्द तयार होतो व तो लक्षणेने मराठीत ''कोळसा'' हा शब्द तयार झालेला आहे. गोंडीत 'काजळ' या शब्दाकरिता 'किस' म्हणजे विस्तव यापासून तयार झालेला 'कस्सो'' हा शब्द आहे व त्यापासून ''काजळासारख्या रंगाचा'' जो असे तो 'कृष्ण' हा शब्द मराठीत रूढ झाला आहे. जेवण्याकरिता गोंडीत ''जावा + उनमाळ'' म्हणजे तांदळाची लापशी + पिणे असा शब्दप्रयोग आहे. त्यावरून गोंड लोकांचे तांदूळ हे मूळ अन्न होय हे तर कळतेच पण ''जावाउन'' या शब्दापासून जाऊन > जेवण अशा स्वरूपात बदलत मराठीतही त्याच अर्थाने रूढ झाला. मराठीतील 'कान्हा' शब्दाची व्युत्पत्ती गोंडीत लागते. ''कन + हाल्'' म्हणजे ''डोळा +नाही'' तो ''कनहाल''. कणसे हा मराठीतील शब्द गोंडी सेनक > या शब्दापासून आलेला आहे. तसाच नखे हा शब्द गोंडीतील ''चीनक'' या शब्दापासून आलेला आहे. गोंडीतील ''शीर+वळा'' म्हणजे ''खाली + ये.'' यापासून ''शिखा'' हा शब्द रूढ झाला आहे. मराठीतील परशु हा मरसुपासून ''धूळ'' हा तोळी म्हणजे मातीपासून; युवक हा रियोकपासून ''वकील'' हा ''वळकील'' म्हणजे ''बोलकर'' अशा शब्दापासून; ''बीळ'' हा गोंडातील ''वीळशी मंदाना'' म्हणजे छेदून रहाणे अशा अर्थाच्या क्रियापदापासून ; 'कीड' हा गोंडीतील 'कळिए म्हणजे 'सडणारे-सडविणारे' पासून तयार झालेले आहेत.

मराठीत नाते, गोते, पूत हे शब्द गोंडीतूनच आले, गोंडीत रक्तासाठी नेत्तूर शब्द आहे. जे आपल्या रक्ताला लागून 'म्हणजे' नेत्त लागून ते नातलग. गोंडीत 'संदूक किंवा बॉक्स' या अर्थाने गोत्ता हा शब्द आहे. महत्त्वाच्या जिव्हाळ्याच्या वस्तू जशा पेटीत सुरक्षित ठेवल्या जातात, तसेच आपल्या नात्यातील किंवा कुळातील सर्व नातेवाईक 'गोत्र किंवा गोत' नावाने संबोधिले जातात. म्हणजे मराठीतील गोत्र हा शब्द गोंडीतील संदूक अर्थाच्या 'गोत्ता' पासून रूढ झाला आहे. गोंडीत नवीन मूल जन्मण्याच्या क्रियेला ''येर पुरतू'' असे म्हणतात, येर+पुरतू या गोंडी वाक्य खंडापासून पुरतूचा > पुतरू व पुढे पुत्र किंवा पूत असा शब्द मराठीत रूढ झाला आहे.

केवळ शब्दाचीच उत्पत्ती गोंडीत शोधण्याचा प्रश्न नाही तर मराठी भाषेच्या वैय्याकरणिक नियमांच्या संदर्भात किंवा मराठी भाषेचे मूळ शोधण्याच्या संदर्भात गोंडी भाषेकडे जिज्ञासू आणि शोधक वृत्तीने बघितले पाहिजे, असे वि. आ. खैरे वगैरे मंडळी बोलू लागलेली आहे. (१७) या संदर्भात महाराष्ट्राचे ख्यातनाम मराठी साहित्यिक डॉ. भाऊ मांडवकरांचे विचार तर सर्वांनाच माहित आहेत. त्यामुळे या बाबतीत अधिक विस्तार नको. पण गोंडीभाषेचे स्वरूप बघून गोंडी भाषिकांचा

सामाजिक दर्जा कसा याचा अंदाज घेणे मात्र येथे थोडक्यात का असेना पण आवश्यक आहे.

शब्द किंवा वाक्य प्रक्रियेतून समाजाचा इतिहास किंवा स्वरूप पाहण्याची दृष्टी असणे येथे जरूरीचे आहे. कारण त्याशिवाय मानवी व्यवहारांची पातळी, नात्यानात्यांतील व्यवहार मर्यादा, स्त्रियांचे पुरूषांसंबंधीचे नाते, सापेक्ष असलेला कटाक्ष आणि त्यांचा दर्जा तसेच अभिवादनादी प्रकार वरून केवळ भाषेच्या वैय्याकरणिक पृथ:करणाच्या आधारे गोंडीयनांचा सामाजिक दर्जा, नैतिक पातळी आणि धर्मसंहिता स्पष्ट करून सांगणे अवघड वाटत असले तरी सहज शक्य आहे.

ज्या समाजात जास्तीत जास्त नाते संबंध प्रस्थापित होतात तो समाज अत्यंत वैभवसंपन्न मानायला पाहिजे. जेवढ्या अधिक क्षेत्रामध्ये मनुष्य आपला पुरूषार्थ खर्च करतो तेवढ्या अधिक प्रमाणात त्याची विविध नाती तयार होतात. जसे प्राकृत भाषा काळापूर्वी मावशी व नात्याकरिता मराठीत शब्द नव्हेत. गोंडीत मात्र अनुक्रमे 'कूचो' आणि 'आका' हे शब्द प्राचीन काळापासून आहेत. मराठीत आईची आई आणि बापाचीही आई ''आजी'' होते. पण गोंडीत मात्र आईची आई 'काका' व बापाच्या आईला बापी व आजी म्हणतात. काकोशी थट्टा होत नाही. आजीशी थट्टा करता येते. आईचे बाप व वडिलांचे बापाला मराठीत 'आजोबा' हा एकच शब्द आहे व दोघांशीही थट्टा चालते. पण गोंडीत मात्र आईचे वडिल थट्ट्याचे 'आको' होतात. आणि वडिलांचे वडील ''तादो'' होतात व थट्टा वर्ज. मराठीत लहान असो की मोठी असो 'बहीण' या नात्याने एकच व्यवहार असतो, पण गोंडीत मोठी बहीण 'सेलाल' होते, तर लहान बहीण 'तकाल' होते आणि लहान भाऊ 'तडाल' आणि मोठा भाऊ 'तम्मू' होतो. याही पुढे मराठी संस्कृतीमध्ये कोणीही कुणाचे नाव घेऊ शकतो. परंतु गोंडीयनांमध्ये बायकोची मोठी बहीण, नवऱ्याची मोठी बहीण म्हणजे 'तंगोराल''; नवऱ्याचा मोठा भाऊ म्हणजे ''तयमुळ्याल'' लहान भावाची पत्नी ''तमुरकोळ्याल'' यांची त्यांच्या गैरहजेरीत सुद्धा नावं घेता येत नाही. आणि समक्ष परस्पर अंगाला किंवा कपड्यांना सुद्धा स्पर्श करता येत नाही. यावरून मराठी संस्कृतीपेक्षा गोंडीयन समाजरचनेत नात्यानात्यांतील बारकावे आणि व्यवहार मर्यादांचे काटेकोर पालन केले जात असल्याचे फार प्राचीन काळापासून दिसून येते. विहिणीशी व्याही गोंडी संस्कृतीत ''पारी-पाऱ्याल'' कधीही थट्टा करीत नाहीत.

मराठीत उद्यानंतरच्या येणाऱ्या दिवसाकरिता आणि कालपूर्वी आलेल्या दिवसाकरिता 'परवा' हा एकच शब्द आहे. परंतु गोंडी भाषेत त्या दोन्ही दिवसांकरिता अनुक्रमे ''मन्ने'' व ''अंटी'' असे भिन्न शब्द प्राचीन काळापासून आहेत. तसेच मन्ने नंतरच्या येणाऱ्या दिवसांकरिता 'तिरने' व 'पिरणे' त्याचप्रमाणे ''अंटी'' पूर्वी आलेल्या दिवसांकरिता ''हदन्टी'' असे वेगवेगळे शब्द आहेत. यावरून गोंडीयन संस्कृती जगणारा माणूस मराठी संस्कृती जगणाऱ्यांच्या नात्यातील ढोबळपणा लक्षात आल्यावर 'मराठी लोक मॅनर्स आणि एटीकेटस् जाणत नाहीत असे समजून बसला तर आपण त्यास काय म्हणाल?

ही किमया गोंडी भाषेचीच होय ना !

● ● ●

*('लोकराज्य' आदिवासी विकास विशेषांकामधून साभार)*

# गोंड गोवारी आणि माना

- शैलजा देवगावकर

विदर्भात अनेक मागासलेल्या जनजाती व जमाती आहेत. आदिवासी हा शब्द सापेक्ष अर्थाने वापरावयास हवा. अतिप्रगत युरोप किंवा अमेरिकेतील संस्कृतीतील आजच्या लोकांचे पूर्वजही कधीतरी आदिवासी होतेच व या अर्थाने आपण सर्वच आदिवासींचे वंशज आहोत. म्हणून निसर्गावस्थेतील मानवीय संस्कृतीपासून एखाद्या समूहाने किती वाटचाल केली आहे, म्हणजेच सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत ती जमात (तिच्यातील काही मोजक्या व्यक्ती नव्हेत) किती पुढे गेलेली आहे यावरूनच त्यांचे वर्गीकरण आदिवासींत करावे किंवा नाही हे ठरवावे लागेल. यासाठी वंशशास्त्रीय व मानवशास्त्रीय विचार व्हावयास हवा.

विदर्भातील आणि प्रामुख्याने नागपूर-चंद्रपूर भागातील माना आणि गोवारी या दोन जमातीबद्दल बरेच उलटसुलट विचार मांडण्यात येतात. म्हणून थोडे शास्त्रीय विवेचन करावे, या उद्देशाने हा लेख लिहिलेला आहे.

वंशशास्त्रदृष्ट्या वांशिक मूळ शोधण्यासाठी चेहरा, डोके, नाक इ. अभ्यास करण्यात येतो, त्या दृष्टीने हे विवेचन केलेले आहे.

मानवा-मानवामध्ये कितीही भेद असले, तरी त्यांच्यात एवढे साधर्म्य आहे की, त्यांची सर्वांची मिळून एक जीवजाती होते. त्याचप्रमाणे मनुष्य जातीचे असे गुणधर्म (उदा. विशिष्ट शरीररचना) सोडले तर इतर गुणधर्मात माणसा-माणसात फरक आढळतो व त्या फरकावरून माणसाचे गट करून त्या आधारे वंश ठरविण्यात येतो. ह्या वर्गीकरणाची तत्त्वे आहेत मनुष्याचा रंग, उंची, अवयवांची प्रमाणे, केसांची आकृती, डोक्याची आकृती व परिमाण, चेहऱ्याचा आकार, नाकाचा आकार आणि डोळ्यांचा रंग व आकार. हे गुणधर्म व शरीर प्रमाणे लक्षात घेऊन मानवशास्त्रज्ञ वंशवर्गीकरण करतात. भारतात बहुतेक मानववंश निमगोरा आणि मध्यम उंचीचा आहे. भारतातील बहुसंख्य लोक 'वेद्द' या युरोपीय वंशातील गणले जातात.

भारतातल्या आदिवासी जमातीतील लोक ठेंगणे, काळे (निग्रोइतके नाही), नाक नकटे व रूंद अशा स्वरूपाचे सर्वसाधारणपणे आढळतात. त्यांच्या भुवयांची खालची हाडे पुष्कळदा बरीच वरती आलेली असतात. त्यामुळे डोळे खोल गेलेले वाटतात. अंगकाठी बारीक आढळते.

वरील मानववंशाच्या वर्गीकरणाच्या संदर्भात आपण काही वन्यजमातीबद्दलची अभ्यासपूर्ण माहिती बघू. त्याची प्रमाणे पण मुद्दाम दिली आहेत. ती प्रख्यात समाज शास्त्रज्ञ प्रा. इरावती कर्वे यांच्या अभ्यासपूर्ण ग्रंथातून घेऊन दिलेली आहेत.

**गोवारी आणि गोंड गोवारी**

गोवारी ह्यांची मानवशास्त्रदृष्ट्या मापे अशी-

| | | |
|---|---|---|
| डोक्याचा घेर | : | ५३०.१८ |
| डोक्याचे सापेक्ष प्रमाण | : | ७५.१८ |
| नाकाच्या उंचीचे प्रमाण | : | ११२.२७ |
| नाकाच्या लांबी-रूंदीचे सापेक्ष प्रमाण | : | ८३.२३ |
| वरच्या जबड्याच्या लांबीचे प्रमाण | : | ४४.६८ |
| चेहरा व डोके ह्यांच्या रूंदीचे प्रमाण | : | २५.५७ |

गोवारी लोक सामान्यत: लहान डोळ्याचे आढळतात. नाके रूंद आढळतात व बसकी आहेत. इतर अन्य जमातीच्याजवळ मापे जातात.

प्रा. इरावती कर्वे त्यांना 'नागपूर प्रांतातले गुराखी' म्हणतात. मात्र गाई-बैलापेक्षा 'म्हशी बाळगणारे गुराखी' असे त्या म्हणतात. भारतीय संस्कृति-कोश खंड ३ मध्ये त्यांना अहीर व गोंड यांच्यापासून बनलेली एक मिश्र जात असे म्हटले आहे. मुख्यत्वे विदर्भातच ह्यांची वस्ती आढळते. रसेल आणि हिरालाल यांच्या Castes and Tribes of Central Provinces of India. ह्या ग्रंथातही गोंड आणि गोवारी ह्यांची मिश्र जात म्हणजे गोंड-गोवारी असे म्हटले आहे. प्रामुख्याने नागपूर व चंद्रपूर या जिल्ह्यामध्येच त्यांची वस्ती आढळते.

यांच्यातही पोटभेद आढळतात.


१) गायगोवारी, २) इंगागोंवारी, ३) गोंडगोवारी. 'इंगा' असे कुलनाम छोटा नागपूरच्या वन्य जमातीत देखील आढळते. गायगोवारींना श्रेष्ठ मानण्याची प्रथा आहे. गुरे चारणे व शेतकी हे त्यांचे प्रमुख व्यवसाय आहेत.

गोवारी हे गोंड-गोवारींना दूरचे मानतात. कारण सात भावांपैकी दोन भावांनी गाईचे मांस चुकीने खाल्ले म्हणून इतर भावांनी त्यांच्याशी संबंध तोडून टाकलेत व त्या दोघा भावांची एक अलग जात निर्माण झाली, असे सांगण्यात येते.

''गोवारी किंवा गोंड गोवारी'' असे दोन अलग-अलग शीर्षकाखाली 'रसेल आणि हिरालाल' माहिती देतात.

**गोंड-गोवारी**

गोंड-गोवारी सहा देवे आणि सात देवे आहेत. दुर्गादेवीची ते पूजा करतात. तसेच मृत पूर्वजांची पण पूजा करतात. देवांना लाल कपड्याच्या तुकड्यात बांधून ठेवतात आणि काही महत्त्वाच्या सणांना किंवा दिवसांना बाहेर काढतात. गोंड-गोवाऱ्यांत प्रौढ विवाह आहेत. वधूमूल्य देण्याची प्रथा आहे. लग्नाचा मुख्य विधी म्हणजे मातीच्या बोहल्याभोवती सात फेऱ्या मारणे हा होय.



**गोंड पुरूष**

विधवा विवाहाची प्रथा असून त्या विवाहात साडेतीन फेऱ्या मारतात. गोंदण्याची चाल आहे. नखशीखांत गोंदलेल्या स्त्रिया आणि पुरूषही सापडतात. ज्या स्त्रीने गोंदण केले नाही. ती अपवित्र मानतात व देवीची पूजा करण्याचा अधिकार तिला प्राप्त होऊ शकत नाही. पोशाख साधा मराठमोळा असतो आणि मृतांच्या पूजेच्याबाबत खास असे कोणतेच कडक निर्बंध नाहीत.

मराठा राज्यातील पशुपालन करणारी जात (grazier) म्हणजे 'गोवारी' असे हिरालाल आणि रसेल यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे. (gai-gao (the cow) Gaolis - Gowaris) - अशी उपपत्ती पण त्यांनी दिली आहे. त्याबाबत त्यांच्यात लोक कथाही आहेत. उदा.- भगवान कृष्णाच्या गाई जंगलात चरायला नेणाऱ्या एका अहिराला एक मुलगा रडत असताना दिसला. तेव्हा त्याने त्या मुलाला आपल्या घरी नेले आणि त्याचे पालन-पोषण केले व त्याला आपल्याप्रमाणेच गाई सांभाळण्याचे काम दिले. हाच गोवारींचा 'मूळ पुरूष'. पुढे त्याच्या संततीने मोर खाणे इत्यादी मांस भक्षण सुरू केल्याने गवळी लोकांनी त्यांना आपल्यापेक्षा कमी दर्जाचे समजण्यास सुरुवात केली. नंतर मात्र एका पंक्तीत बसू

**अलंकृत गोंड युवती**



देऊ लागले.

जंगलात सापडलेला तो मुलगा, जो गोवारी लोकांचा मूळ पुरूष, तो गोंड होता. याचा अर्थ अहीर व गोंड यांची मिश्र जात म्हणजे गोवारी असे समजण्यास सुरुवात केली. नंतर मात्र एका पंक्तीत बसू देऊ लागले.

जंगलात सापडलेला तो मुलगा, जो गोवारी लोकांचा मूळ पुरूष, तो गोंड होता. याचा अर्थ अहीर व गोंड यांची मिश्र जात म्हणजे गोवारी असे समजण्यास काहीच हरकत नाही, असे रसेल व हिरालाल यांचे मत आहे.

यांच्यातही गोंदण्याची चाल आहे. पुरूष आपल्या कपाळावर उभी रेघ व स्त्रिया आपल्या उजव्या हाताच्या कोपराखाली नागमोडी रेषा गोंदवून घेतात. बायकांच्या या गोंदण्या 'सीतेचा हात' म्हणतात.

लग्न एकाच कुळात करीत नाही. मामाची मुलगी म्हणजे आतेघरी सून चालते. बहिणींची मुले लग्न करू शकत नाहीत. प्रौढ विवाहाची व वधू-मूल्याची प्रथा आहे. शुभदिवस ठरवून लग्न करतात. लग्नविधी भाच्याकडून (मुलीच्या वडिलांचा किंवा मुलाच्या वडिलांचा भाचा) पार पाडला जातो. बहिणीच्या मुलाला फार महत्त्व असते. मुलीच्या घरी लग्न होते. ब्लँकेटमध्ये गुंडाळलेल्या आणि तलवार हाती घेतलेला नवरदेव वाजतगाजत वधूचे घरी मिरवणुकीने येतो आणि जातीच्या लोकांना जेवण दिले जाते. घटस्फोट आणि विधवा-विवाहाला मान्यता आहे.

गोवारी मेघनाथ, वाघोबा देव, दुल्हादेव, इ.ची पूजा करतात. 'काडे-कोडेवान' हा त्यांचा प्रमुख देव. उत्सवप्रसंगी त्याची पूजा करतात.

त्यांच्यात जातपंचायत असते. त्यांच्या प्रमुखाला 'डोंड्या' म्हणतात. त्याची निवडणूक होते.

'लोहार, अंबादरे, कोहारिया, रावत, साखैना' इ. कुलचिन्हे त्यांच्यात आढळून येतात.

मृताला जाळण्याची तसेच पुरण्याची प्रथा आहे. मृताच्या नावाने घराच्या बाहेर मास ठेवून कावळ्याची ....वाट बघण्यात येते. कावळ्याने त्याला स्पर्श केल्यावरच मग इतर लोकांना जेवण देण्यात येते. तसे झाले नाही तर एक रात्र वाट बघून मग गाईला प्रसाद देऊन जेवण करतात. मृत पूर्वजांची विवाहाच्या वेळेस व उत्सवप्रसंगी पूजा करतात.

गोवारी माकडाचे मांस आणि गाईचे मास सोडून बाकी सर्व प्रकारचे मांस खातात. कबुतराची मात्र शिकार करीत नाहीत, कारण या कबुतरामुळेच त्यांच्या चोरीला जाणाऱ्या गाई त्यांना परत मिळाल्या, अशी एक लोककथा प्रचलित आहे. रोमन लोकांच्या पवित्र हंसपक्षाच्या कथेसारखीच ही कथा वाटते.

**माना**

अति लहान डोक्यांच्या घेरात (घेर ५१८-५२५) मानांची वर्णी लागते म्हणूनच माना व आंध ह्यांचे वन्य जमातीशी जवळचे नाते म्हणूनच माना व आंध ह्यांचे असावेसे वाटते. कुणबी लोकांमध्येही खैरे-तिरळे बरोबर एक माना-कुणबी हा पोटभेद आढळतो. त्याबाबत संशोधन व्हावयास हवे 'माना' ना, 'मान', 'माने' असेही संबोधिले जाते. लांब डोक्याचे आणि 'रूंद'

चेहऱ्याचे हे लोक आहेत.

माना लोकांनी सुमारे दोन शतके गोंडवन भागात (चंद्रपूर व आसपास) राज्य केले. रसेल आणि हिरालाल 'माना' लोकांना 'द्रविडीयन' म्हणतात. मुख्यत: शेतकरी आणि शेतमजूर असे हे लोक आहेत. मूळ वंशाबाबत (Origin-obscure) असे शब्द म्हणजे 'अस्पष्ट-अव्यक्त' असा शेरा देण्यात आलेला आहे. मात्र मेजर ल्युसी स्मिथ (१८६९) यांनी त्यांच्या Chanda settlement Report मध्ये मानांच्या बाबत लिहिताना म्हटले आहे की, - गोंडांच्या पूर्वी अहेरीजवळ सुरजागड आणि माणिकगड पहाडी भागात माणिकगड येथे माना लोकांचे राज्य होते. दिसायला ते गोंडांसारखे आहेत. ते सुदृढ बांध्याचे असून स्वभावाने प्रामाणिक व उद्योगी आहेत. सैनिकी पेशाच्या योग्य बरेच गुण यांच्यात असले; तरी आता त्यांनी त्यांच्या तलवारी म्यानात आणि ढाली भिंतीवर ठेवल्या आहेत आणि शेती या व्यवसायात ते रमले आहेत.

श्री. हिस्लॉप (Papers on the aborginal Tribes of the Central Provinces) आपल्या प्रस्तुतच्या लेखात म्हणतात - 'गोंडाचे जे मंत्री होते (सरदार म्हणा) व जे शकुन वगैरे सांगत असत, त्यांच्यात 'माना-ओझा' होते. ते आपल्या पवित्रतेला अत्यंत जपत असत. कोणत्याही इतर जातीच्या हातचे खात नसत.

१४ व्या शतकात गोंडाच्या पूर्वी माना राज्यकर्ते असताना 'मानिक्यादेवी' ही त्यांची कुलदेवता होती. कदाचित वैरागडचे प्रमुख व बस्तरचे राजे ह्यांचे नातेसंबंध असावेत असा अंदाज केला जातो. 'चंद्रपूरचा इतिहास' या आपल्या ग्रंथात अ.जा. राजूरकर लिहितात- 'सुरजागड सध्या चंद्रपूरच्या सिरोंचा तालुक्यात आहे. वैरागडचा नागवंशीय माना राजा सुजेत बडवाई ह्याने बांधलेला किल्ला सुरजागड टेकडीवर आहे.' यात ठाकूर देवाची स्थापना केलेली असून हत्ती व योद्धे यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

मात्र काही मानांचे असे म्हणणे आहे की, माना आणि गोवारी ह्या गोंडाच्याच उपजाती (off-shoots) आहेत. माना, गोवारी आणि गोंड ज्वारीची आंबील आणि घेवडा एकत्र पंगतीत बसून खातात. ही प्रथा वरील म्हणण्याला दुजोरा देते असे वाटते. बस्तरमध्ये 'परजा' जमात गोंड राज्यकर्ते आल्यावर ज्याप्रमाणे गोंडांशी संबंधित राहिली, त्याप्रमाणे ह्या विभागात माना लोकही गोंडांशी संबंधित राहिले असावेत. इतकेच नव्हे तर 'मन्नेवार' अशी गोंडांची उपजमात आहे त्यातील 'वार' हा अनेक वचनी तेलगु प्रत्यय सोडला तर मानाचा संबंध गोंडांशी येतो.

भंडारा जिल्ह्यात ह्या मानांविषयी एक दंतकथा प्रचलित आहे की, एका फार मोठ्या घारीची शिकार (ती घार पिकांची फार नासाडी करीत असे) एका शूर मानाने केल्यामुळे त्या भागात मानांना गोंड राजाने जाहीर केल्यामुळे जमिनदारी मिळाली आणि शेती व्यवसायात माना शिरलेत. काटोल व आसपासच्या भागात राखणदार आणि वसुली करण्यासाठी म्हणून जहागीरदार लोक मानांना आपल्याकडे ठेवीत. आज मात्र तशी परिस्थिती दिसत नाही. बहुतेक माना शेती करताना दिसतात.

मानांच्या दोन पोटजाती - १) बडवाईक माना (२) खाद माना. तिसरा एक भाग कुणबी लोकांत मिसळून गेला असे सांगतात. तोच 'कुणबी माना' असावा.

मानांमध्ये अनेक कुळे असून एकाच कुळाच्या आत विवाह करीत नाहीत. प्रत्येक कुळाचा एकेक भाट असतो. जमारी, गझबे, नरनारी, वाघ आणि रावत इ. कुळे आहेत. वधूमूल्याची पद्धती आहे. वर-पिता पैसे घेऊन वधूच्या घरी जातो. त्याच्याबराबेर लग्न झालेली एकच कर्ती-सवरती बाई जाते आणि ती पाच वेळा तांदूळ नवरदेवाच्या अंगावर टाकते. बहिणींच्या मुलांची लग्ने होत नाहीत. आतेघरी सून चालते, उलट ही प्रथा

लोकप्रिय आहे. विधवा-विवाहाची प्रथा आहे. अपवित्र स्त्रीला पवित्र करून घेत असताना दंडादाखल तिच्याकडून तीन जेवणे घेतात. मृतांना पुरण्याची व जाळण्याची अशा दोन्ही प्रथा आहेत. पुरल्यास लागलीच जेवण द्यावे लागते. नंतर कोणतेही क्रियाकर्म करीत नाहीत. जाळल्यास तीन दिवस सुतक पाळतात. गोंडांप्रमाणे पाय उत्तरेकडे करून पुरण्याची प्रथा आहे. मुलाच्या जन्मानंतर स्त्री सात दिवस अपवित्र मानतात. शिवरात्री, आखाडी किंवा अखतीज आणि माघ व फाल्गुनमधील शुभ दिवस उत्सवाने साजरे करतात. दिवाळी पण साजरी करतात.

**निष्कर्ष**

वरील विवेचनावरून या दोन जनसमूहासंबंधी काही ठळक निष्कर्ष काढता येतील. गोवारी आणि गोंड-गोवारी यांचा वांशिक संबंध प्रस्थापित होतो. गोंड-गोवाऱ्यांमधील देवावर आधारित गोत्र, देवीची भक्ती, मृत पूर्वजाची पूजा, मुलींचे प्रौढ विवाह आणि वधूमूल्य देण्याची प्रथा; इतकेच नव्हे तर, गोंदण्याची प्रथा ह्या गोंड जमातींशी वांशिक साधर्म्य दाखविणाऱ्या बाबी होत. काही भावांनी गाईचे मांस चुकीने खाल्ले, असा जो उल्लेख सापडतो, तोही गोंड जमातीशी सख्य दाखविणारा आहे. या सर्व गोष्टी सांस्कृतिकरणाच्या कनिष्ठ स्तराला असल्याचे प्रतीक होत. विवाहविधीतील सात फेऱ्या हा प्रकार मात्र भोवतालच्या सांस्कृतिक प्रभावाचा दर्शक वाटतो. गोवारी हे केवळ गवळी होते, असे गृहीत धरले तरी पशुपालनाची अवस्था ही शिकारीनंतरची अवस्था होय. गोवाऱ्यांमधील वाघोबा देव, कोडे-कोडेवान इ. देवता गोंडांच्या देवतेसारख्याच आहेत. साखैना हे कुलचिन्ह गोंडांच्या साखेत शाखेसारखे वाटते. यावरून गोवारी ही सांस्कृतिकरणाच्या प्रक्रियेत थोडी पुढे आलेली, तर गोंड-गोवारी ही त्यापेक्षा बरीच मागे असलेली आणि गोंड जमातीशी फार पूर्वीच्या काळी वांशिक संबंध असलेली आदिवासी जमात आहे, असे म्हणता येईल. नागपूर व चंद्रपूर या दोन जिल्ह्यांमध्ये गोंड राजांचे राज्य होते, हे ऐतिहासिक सत्य होय. तेव्हा गोंडांमधील पशुपालन करणारी पोटजात असेही तिचे विर्णन करता येईल.

माना हे द्रविडीयन वंशाचे होत असे म्हटले जाते. सुरजागड आणि माणिकगड भागातील मानांचे राज्य हे आदिवासींच्या अतिमागास प्रदेशातील राज्य असल्याने व गोंडांचे सरदार या नात्याने त्यांचा जो उल्लेख सापडतो, त्यावरूनही त्यांचा गोंडांशी संबंध प्रस्थापित होतो. 'नागवंशीय माना' हाही 'नाग' वंशाच्या आदिवासींच्या द्वारा त्यांचा संबंध प्रस्थापित करतो. 'मन्नेवार' ह्या गोंड उपजमातीच्या वर चर्चिलेल्या शाब्दिक उपपत्तीवरून मानांचा गोंडांशी संबंध लागतो. मात्र इतर जमातीपेक्षा मानांमध्ये सांस्कृतिकरणाची प्रक्रिया लवकर पुढे गेली आणि त्यामुळेच ग्रामीण समाजात दर्जा (Status) प्राप्त असलेले कुणबी जमातींचे लोक व आपण फार जवळचे आहोत हे दर्शविण्याची शेती करणाऱ्या मानांना इच्छा झाली व त्यातून वंशदर्शक गोंड हा प्रत्यय काढून व्यवसाय आणि दर्जादर्शक 'कुणबी' हा प्रत्यय लावण्याची प्रथा काही मानांमध्ये पडली, असे म्हणता येईल. चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर भोवती असलेल्या शंकरपूर किंवा सुरजागड-माणिकगडच्या भागात गोंडांच्याच सारखी परिमाणे व चेहरे असलेले माना अनेक आढळतात.

वरील विवेचनाचा उद्देश एवढाच की, एखादी जमात ही आदिवासी जमात आहे किंवा नाही हे ठरविताना त्या जमातीचा वंशशास्त्र व सांस्कृतिक मानवशास्त्र यांच्या संदर्भातून अभ्यास व्हावयास हवा. इतर कोणताही दृष्टिकोन हा अशास्त्रीय व अपायकारक ठरू शकतो.

● ● ●

*('वैदर्भीय आदिवासी - जीवन आणि संस्कृती' या पुस्तकातून साभार)*

# चिरंतन रात्र

- आचार्य. शं. रा. भिसे

ह्या वनवासी जनतेची संख्या मुंबईच्या जवळच्या जिल्ह्यात लाखांनी मोजण्यासारखी आहे. त्यांत वारली, कोकणे, ठाकूर, कोळी (डोंगरी), कातकरी, दुबळे, व धोडी या जातीचा प्रामुख्याने समावेश होतो. यांपैकी दुबळे व धोडी हे गुजराती आहेत. ते बहुधा बंदर-पट्टीत राहतात. जंगलातील काम त्यांना फारसे साधत नाही. विशेषत: दुबळे, राहणी व कामधंदा यादृष्टीने पुष्कळ सुधारलेले व इतर वनवासी जातीपासून भिन्न दिसतात. त्यांचा समावेश ह्या वनवासी जातीत कसा झाला असेल कोण जाणे! ह्या दुबळ्यांपैकी पुष्कळ लोक बंदर-पट्टीतील बागांतून व वाड्यांतून बागाईतीचे काम करीत असतातत. तसेच त्यांच्यापैकी काही जण पारशी लोकांकडे घरकामासाठी राहतात. जे पारशांच्या सहवासात आले, त्यांची आणि विशेषत: त्यांच्या बायकांची राहणी पुष्कळच बदलली आहे. अशा दुबळ्यांची एक निराळी जातच बनू पाहात आहे. त्यांना 'वटेला दुबळाओ' 'बाटलेले दुबळे' असे संबोधतात.

वारली व कोकणे ह्यांच्या राहणीत, पेहरावात बाह्य दृष्टीने फरक नाही. ते डोंगरातून, दऱ्याखोऱ्यांतून, अथवा काही ठिकाणी पांढरपेशा वस्तीला लागूनही राहतात. ते शेतीची कामे करतात, बागायतीची करतात, जंगलातील करतात, गाडीभाडेही करतात. आणि पांढरपेशांच्या घरांत गडी राहतात. ठाकूर व कोळी हे जिल्ह्याच्या पूर्व भागात आहेत. ते बहुधा लहान डोंगराच्या पठारावर राहतात. ठाकुरांजवळ गाई, बैल पुष्कळ व चांगले असतात. ते शेती करतात, जंगलातील कामे पण करतात. ठाकूर हे स्वभावाने फार भित्रे. कसल्याही प्रकारचा प्रतिकार करणार नाहीत. त्यांची राहणी, दुबळे सोडून, इतर वनवासी जातींच्या राहणीपेक्षा अधिक चांगली असते. कोळी हे किंचित् दांडग्या प्रवृत्तीचे लोक आहेत. असे वाटते की, ज्याप्रमाणे खानदेशात आणि आजूबाजूला भिल्ल हे मूळचे रहिवासी, त्याप्रमाणे सह्याद्रीच्या उत्तर भागात पायथ्याशी व माथ्यावर राहणाऱ्या वनवासी जनतेत कोळी हे प्रमुख असावेत. ह्या भागाला, म्हणजे नाशिकचा पश्चिम व दक्षिण भाग, नगराचा पश्चिम कोपरा, व पुण्याचा वायव्य कोपरा, ह्याला कोळवण हे नाव होते. हल्लीचे नाशकातील कळवण हे कोळवण ह्याचाच अपभ्रंश असावे. हा सर्व मुलूख कोळी जातीच्या ताब्यात असावा.

राहता राहिले कातकारी, यांना कातोडी असे पण म्हणातात. कात करण्याच्या त्यांच्या मूळच्या धंद्यावरून त्यांना कातकरी असे नाव मिळाले असावे. कातकरी याचाच अपभ्रंश कातोडी. ह्यांची वस्ती कुलाबा (आताचा रायगड) जिल्ह्यातही आहे. पण तिकडील कातोड्यांपेक्षा ठाणे जिल्ह्यातील कातकऱ्यांची स्थिती अधिक बिकट व दु:सह आहे. ठाणे जिल्ह्यात काही ठिकाणी त्यांना अस्पृश्य गणले जाते. काही ठिकाणी त्यांना गुन्हेगार जाती म्हणूनही मानले जाते.

ह्या कातकऱ्यांच्या जवळ जमीन नाही, कायमचे असे घरदार नाही, त्यांची राहणी अगदी गलिच्छ. पावसाळ्यात ते शेतातील मोलमजुरी करतात आणि आठ महिने जंगलांत कोळसा पिकविण्याचे काम करतात. हे काम करण्यासाठी जंगलाचे कंत्राटदार त्यांना बायकांमुलांसह, आणि बिऱ्हाडबाजल्याच्या आपल्या टोपलीभर सामानासह कामाच्या सोयीप्रमाणे एका

ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेत असतात. 'गोगलगाईचे बिऱ्हाड तिच्या पाठीवर', अशी म्हण आहे; त्याप्रमाणे कातोड्याचे बिऱ्हाड त्याच्या डोकीवर, हे अगदी खरे आहे. जंगलाच्या तोडीला सुरुवात झाली म्हणजे आपले टोपलीतले बिऱ्हाड घेऊन कंत्राटदाराचा माणूस नेईल तिकडे ह्या कातोड्यांना जावे लागते. निमूटपणाने ते गेले नाहीत. तर त्यांना बळजबरीने मारहाण करून, धरून, बांधून नेले जाते. एखाद्या प्रसंगी एकाच कातोड्याला दोन कंत्राटदारांचे मुकादम 'अंगावर' पैसे देऊन जातात. आणि प्रत्यक्ष कामाला नेण्याची वेळ येते, तेव्हा दोन्ही कंत्राटदारांच्या माणसांकडून त्याला मार खावा लागतो! आणि कधी कधी कंत्राटदारांच्या माणसांतही मारामारी होते. बोलूनचालून जंगलाचा व्यवहार तो. तेव्हा जंगली व्यवहाराचे नियमन करणारे कायदेसुद्धा जंगलीच असले पाहिजेत.!

ज्या ठिकाणी कोळसे पाडण्याचे काम चालते तो भाग अगदी दाट जंगलात, अथवा डोंगराच्या अडचणीच्या जागी असतो. त्या ठिकाणची मोठी मोठी झाडे तोडण्याचे काम वारल्यांनी केलेले असते. त्या मोठ्या मोठ्या झाडांच्या लहान फाद्यांचे बारीक बारीक तुकडे करणे, ते ज्या ठिकाणी कोळशाची भट्टी लावायची असते, त्या ठिकाणी वाहून नेणे, भट्टी रचणे, तिच्यावर माती पसरणे, पाणी शिंपून ती भिजवणे, भट्टी पेटवली म्हणजे तिच्यावर पहारा ठेवणे,ती तयार झाली म्हणजे तिच्यातून थोडेथोडे जळते कोळसे बाहेर ओढून काढून ते पाण्याने विझविणे, आणि शेवटी सर्व कोळसे तयार झाले म्हणजे ते पोत्यांतून भरून ती पोती शेठच्या मोटरीत भरून देणे, एवढ्या क्रिया झाल्या म्हणजे त्या कातोड्याला आपल्या श्रमाबद्दल मजुरी लागू होते. जर एखादी कोळशाची भट्टी पूर्णत: किंवा अंशत: बिघडली, कोळसा कच्चा राहिला किंवा कोळशाची राख झाली, तर त्या गरीबाची केलेली सर्व मेहनत फुकट जाते, आणि उलट आपल्या मालाचा नाश केला, म्हणून शेठच्या लोकांकडून अथवा कधी कधी प्रत्यक्ष शेठच्या हातचा मारही खावा लागतो. काही भट्ट्यांतून लाकडांच्या ओंडक्यांबरोबर या गरीब कामकऱ्यांची हाडेही जाळली गेल्याच्या, अंगावर शहारे आणतील अशा, अमानुष निर्दयपणाच्या हकीगतींचा उल्लेख सरकारी कागदपत्रांतून सुद्धा आहे.

जळणारे कोळसे विझविणे हे थोडे कौशल्याचे आणि अत्यंत त्रासाचे काम आहे. त्यासाठी पाणी पुष्कळ लागते. आणि ते भट्टीपासून कधी कधी काही मैलांवरसुद्धा असते. ते आणण्यासाठी या कातोड्यांच्या बायकामुलांचा सर्व वेळ जातो.

कामाचे पैसे त्याला जर योग्य रीतीने मिळाले तर सबंध मोसमात एक कातकरी सुमारे ७५ रूपये कमावू शकतो. पण त्याच्या कामाचे सर्व पैसे क्वचितच त्याला मिळतात. फार लबाडी होते त्या कामी. कातोड्याला समजते आपल्याला फसवले जात आहे म्हणून. पण हुशार पांढरपेशांची लबाडी थांबवावी कशी, आणि उघडकीस आणावी कशी हे त्याला समजत नाही. आपण तयार केलेल्या कोळशाच्या पोत्यांचा व मिळालेल्या पैशांचा हिशेब तो एका दोरीस गाठी मारून ठेवीत असतो. पण त्याच्या गाठींच्या त्या मुक्या हिशेबाचा शेठच्या बोलक्या, शहाजोग हिशेबापुढे काय टिकाव लागणार ! कामाचा हिशेब वेळच्या वेळी कधीच केला जात नाही. मोसम संपल्यानंतर मे अथवा जून महिन्यात हिशेब केला जातो. तेथपर्यंत काम सुरू झाल्यापासून दर आठवड्यास त्या कातकऱ्यास थोड्याशा कण्या अथवा तांदूळ आणि दीड रूपया एवढी खर्ची दिली जाते. हिशेब करताना कातकऱ्याच्या अंगावर बाकी निघायचीच; आणि ही बाकी पुढील मोसमाकरता त्याच्या खाती कर्ज म्हणून मांडून ठेवली जाते. तो बिचारा

आयुष्यात कधीही कर्जमुक्त होत नाही, आणि खरे पाहिले तर कर्जाची त्याला परवाही नाही! सर्व मोसमभर कण्यांची आंबील, अथवा कधी कधी तांदळाचा भात अथवा तांदळाच्या पिठाची भाकरी, त्याच्या जोडीला नुसती उकडलेली कसली तरी जंगली पालेभाजी, हे अन्न खाऊन, पुरेसा कपडा अंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी नसल्यामुळे कडाक्याच्या थंडीतही रात्रभर बाजूला शेकोटी करून त्या आगीच्या उबाऱ्यात रात्रीच्या रात्री काढत, कधी चैनीसाठी ताडीची एखाद दुसरी बाटली पिण्यास मिळाली, म्हणजे चैनीची परिसीमा गाठली असे समजून रात्रदिवस अर्धपोटी, अथवा कधीकधी उपाशी राहूनही जुलमी आणि दुष्ट कंत्राटदाराच्या अथवा त्यांच्या हस्तकांच्या चाबकाचे, काठीचे व उग्र निसर्गाचे तडाखे खात तो प्राणी दिवस काढीत असतो.

त्याला नात्यागोत्याची जाणीव नाही, समाजाची ओळख नाही, पशूंप्रमाणे काम करायचे आणि पशूंप्रमाणे मार खायचा, हाच त्याचा जीवनक्रम.

असे हजारो लोक ठाणे जिल्ह्यात आहेत. मानवी समाजातली पोरकी मुले जशी!

इतका हुशार आपल्या कामात; पण स्वार्थ, जुलूम, दांडगाई, बेकायदा वर्तन आणि अनीती यांच्या माराखाली नामोहरम झालेला दुसरा वर्ग ह्या देवाच्या अखिल दुनियेत सापडेल किंवा नाही, याची शंका आहे! त्याची कोणीच काळजी घेतली नाही अद्यापपर्यंत. मजुरांच्या हितासाठी चालविलेल्या अनेक संस्था आणि चळवळी शहरांतून आहेत. पण त्यांचे लक्ष अद्याप ह्या दुर्लक्षित जनतेकडे मुळीच गेले नाही. उत्तर ध्रुवाकडे रात्र सहा महिने टिकते; पण या लोकांच्या जीवनाची एक चिरंतन, अतूट अशी रात्र बनून राहिली आहे. तिचा अंध:कार दूर करण्यासाठी काहीच साधन दिसले नाही आतापर्यंत. कुठूनही प्रकाश येत नाही. येण्याचा संभव नाही. आणि कुणाची अपेक्षा पण नाही.

ह्या हजारो कातकरी कुटुंबापैकी कुणाचीही स्थिती चांगली नसते. जंगलात जिथे काम असेल तिथे कसे तरी सात-आठ महिने काढतात ते आणि पावसाळ्याला एखाद्या खेड्यात वस्ती करून राहतात. कुणाजवळ गाई नाहीत, बैल नाहीत, नांगर नाही, गाडी नाही, एक कोयता आणि एक कुऱ्हाड, आणि सबळ हातपाय ही त्यांच्या उपजीविकेची साधने. हातपाय निर्बल झाले, किंवा काही आजाराने त्यांना गाठले तर त्यांची उपजीविकाच थांबते, - आणि जीवनयात्रा पण.

वारली, कोकणे, कोळी, ठाकूर हे शेती करतात. झाडे, पाने लावतात, गाडीभाडे करतात. लहान मुलांमुलींना शाळेत पाठवतात. वारल्यातले, कोळ्यांतले आणि ठाकरांतले काही लोक सातवीपर्यंत आहेत, काही थोडे मास्तर पण आहेत. पण बाह्य पेशावरून अनभिज्ञ माणसाला त्यांची जात ओळखता यायची नाही. सारे सारखेच. रंगाने अगदी काळे, सगळ्या डोक्यावर केस. ते विस्कटलेले, कमरेखाली लंगोट. बाहेर जाताना एक धोतर गुंडाळायचे आणि अंगात कोपरी किंवा जाकीट घालायचे. हातात एक काठी, हा पोशाख चावडीवर, किंवा रेंजरच्या कचेरीत, किंवा शेठच्या घरी जाताना. जंगलात, किंवा शेतीत कामाला जाताना डोक्याला टोपी किंवा धोतर ऊन लागू नये म्हणून, आणि कमरेला लंगोट. ठाकूर लोक बाजाराला जाताना, कचेरीत किंवा शेठकडे जाताना डोक्याला मुंडासे बांधतील, आणि अंगावर उपरण्यासारखे एक धोतर घेतील.

नेम धरण्यात आणि शिकार करण्यात वारली, कोळी, कातकरी हे फार पटाईत. वाघाची, डुकराची शिकार म्हणजे त्यांना पोरखेळाप्रमाणे. बऱ्याच वेळा कोणी अधिकाऱ्याने वाघाची शिकार अमुक अमुक ठिकाणी

केल्याचे आपण ऐकतो, आणि त्यासंबंधातले फोटो पण पाहतो. पण ह्या प्रकारच्या सर्व शिकारीत खरे धारिष्ट्य आणि कसब या वनवासींचे. या लोकांनी वाघाला शोधायचे, त्याला हुसकायचे, चिडवायचे, पळवायचे आणि घेरून साहेबाच्या जवळ आणायचे. आणि साहेबाने वाघाच्या उडीच्या टप्यापेक्षा अधिक उंचावर बांधलेल्या मजबूत माचणीवर बसून वाघावर गोळ्या झाडायच्या. तिथेही एखादा वनवासी साहेबांच्या पाठीशी दुसरी भरलेली बंदूक रोखून उभा असतोच.

यांच्यातील पोरी तरूणपणी पोरापेक्षा अधिक बांधेसूद, धष्टपुष्ट व रेखीव दिसतात. घरात त्या एकच वस्त्र वापरतात. पण बायका बाहेर जाताना फाटकी तुटकी चोळी, आणि जुनेपाने लुगडे नेसतात. विवाहित स्त्रिया व तरूण पोरी लुगड्याचा पदर छातीवरून घेत नाहीत. तरूण स्त्रियांची फुगीर छाती व पुष्ट स्तन झाकण्याची आवश्यकता त्यांना वाटत नाही. बायकांचे नेसणे त्यांच्या कामाला सोयीस्कर असते.

बायकांच्या गळ्यात काळ्या पोतीच्या पुष्कळशा माळा असतात. त्यात पांढऱ्या, तांबड्या, पिवळ्या वगैरे रंगाचे काचेचे मणी ओवलेले असतात. डोक्यात मुलाम्याच्या गोंड्याची माळ केसांच्या आंबाड्यावरून गुंडाळलेली असते. तसेच मुलाम्याचे गोट दोन्ही हातांत काचेच्या बांगड्याच्या बरोबर घालतात. हाताच्या बोटात पुरूष व स्त्रिया दोघेही अशाच मुलाम्याच्या आंगठ्या घालतात. सोन्या-चांदीचा दागिना बहुधा नसतो.

बायका सर्व प्रकारची कामे पुरूषांच्या जोडीने करतात. शिवाय घरगुती कामे, म्हणजे बाजारहाट करणे, झाडलोट करणे, भांडी घासणे, पाणी आणणे, स्वयंपाक करणे, दळणे, कांडणे, मुलांची निगा राखणे, ही सर्व कामे बायकाच करतात. ही कामे करणे हे पुरूषाला कमीपणाचे आहे, असे समजले जाते. मात्र स्त्रिया गाड्या हाकणार नाहीत, नांगर धरणार नाहीत, जड ओझी उचलणार नाहीत, लाकडे ओढणार नाहीत, आणि शिकारीला जाणार नाहीत.

लहान मुले व पोरी उघड्याच असतात. मुलगी ७-८ वर्षांची झाली म्हणजे कसली तरी एक धांदोटी कमरेभोवती गुंडाळते. वयात आली म्हणजे चोळी व लुगडे नेसते. लग्ने लहानपणीच ठरतात, पण लहानपणी होत नाहीत, काही ठिकाणी जिथे कुटुंबात मुलगा नसेल तिथे घरजावई आणण्याची पद्धत आहे. हा घरजावई - 'घरोरा' - 'घर+वर' - लग्नाच्या अगोदरही घरात ठेवण्याची पद्धत आहे. मात्र त्याने लग्न होईपर्यंत मुलीबरोबर वैवाहिक संबंध ठेवायचा नसतो. काडीमोडीची पद्धती आहे. तशीच पाटाचीही चाल आहे. मुले असलेल्या बाईने पाट लावला तर तिच्याबरोबर तिची मुले नवीन नवऱ्याला सांभाळावी लागतात.

या लोकांच्या कौटुंबिक जीवनात अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लग्न. आणि त्याबाबत ते आपल्या आटोक्याच्या बाहेर खर्च करतात. लग्नाच्या खर्चाची सोय बहुधा कोणाजवळही नसते. कोणातरी शेठसावकाराकडून त्यासाठी कर्ज काढावे लागते. त्या कर्जावर जबर व्याज द्यावे लागते. अथवा शेठच्या घरी कित्येक वर्षे नोकरी करून ते कर्ज फेडावे लागते. स्वत:च्या लग्नासाठी काढलेले कर्ज फिटते न फिटते तोच मुलाच्या लग्नासाठी कर्ज काढण्याचा प्रसंग येतो.

लग्नाला लागणाऱ्या खर्चात काटकसर केली, आणि अगदी कमी खर्चात १०-२० रूपयांत लग्न झाले, तर ह्या लोकांची एक मोठी आपत्ती नाहीशी होईल.

लग्नात मुलीच्या बापाला खर्च मुळीच नाही. पण लग्न झाल्यानंतर जर बायकोच्या अपराधामुळे काडीमोड झाली, तर बायकोला आणि तिच्या बापाला नवऱ्याचा

लग्नाबद्दलचा खर्च दंड म्हणून द्यावा लागतो.

अनेक बायका करण्याची पद्धत आहे. तसेच लग्नावाचूनही नवराबायकोच्या नात्याने कित्येक वर्षे राहण्याची चाल ठाकुरांत आहे. तशा स्थितीत जर मुले झाली तर मात्र त्यांच्या लग्नाच्या अगोदर त्यांच्या आईबापांचे लग्न व्हावे लागते!

या जातीत व्यभिचार नाही असे नाही, पण उघडकीस आला तर जातीला दंड द्यावा लागतो. पांढरपेशा जातींच्या संसर्गाने निराळ्या प्रकारचा व्यभिचार सुरू होत आहे. अविवाहित स्त्रिया फार थोड्या. पुरूष तर मुळीच नाहीत.

संतती फारशी होत नाही आणि बालमृत्यूचे प्रमाण फार. बाळंत झाल्यानंतर १०-१५ दिवसांनी लगेच बाळंतीण कामास लागते. नाही काम केले तर पोटाला काय घालणार ?

लोकांना कामधंदा असतो. काम करणाऱ्या माणसाला काम मिळत नाही असे सहसा होत नाही. पण काबाडकष्टाच्या मानाने त्याला होत प्राप्ती नाही, आणि स्वत:च्या श्रमाने उत्पन्न केलेल्या मालाची राजरोसपणे, कायद्याच्या छत्राखाली भांडवलदारांकडून लूट केली जाते.

शेतीतील खंडाव्यतिरिक्तही पुष्कळ देणे द्यावे लागते त्याला. त्यामुळे शेतीतील पीक खळ्यात येण्याची खोटी, ते पार उडून जाते शेठच्या व सावकाराच्या घरात वर्षभर काबाडकष्ट करणारा हा गरीब असहाय प्राणी धान्याच्या राशीचे दर्शन-सौख्यच फक्त अनुभवीत असतो.

याच्याजवळचा धान्याचा साठा केव्हाच संपून जातो. पण पावसाळ्यापर्यंत कुठे तरी मोलमजुरी करून तो कसाबसा आपल्या कुटुंबाचा गुजारा करीत असतो. त्यातही त्याला दिवसातून दोन वेळा पोटभर खायला मिळाले आहे. असा कपिलाषष्ठीचा योग क्वचितच. परंतु बाहेरील मोलमजुरी पावसाळ्यापासून बंद पडते. तेव्हा पुन्हा धान्य हाती पडेपर्यंत सुमारे चार महिने त्याला भयंकर हालात काढावे लागतात. पावसाळ्याच्या सुरुवातीस तो खाण्यासाठी सावकाराकडून उसने धान्य आणतो. त्याला 'खावटी' म्हणतात. आगोठीला आणलेल्या ह्या खावटीची सराईला दिढीने फेड करायची असते. काही जणांजवळ बियासाठी धान्य नसते. तेही ते सावकाराकडून उसने आणतात. या बी-भाताची फेड त्याला सराईत दुपटीने करावी लागते. काही लोकांजवळ शेतीसाठी लागणारे बैल नसतात. तेही त्यांना उसने आणावे लागतात. त्या बैलांच्या उपयोगाचा मोबदला म्हणून सावकाराला सुमारे पन्नस पायली धान्य द्यावे लागते. याला 'वाफ' म्हणतात.

खावटीव्यतिरिक्त इतर कामासाठी त्याला जर सावकाराने पैसे उसने दिले तर दर रूपयाच्या बदला त्याला सराईत सुमारे तीन रूपये किमतीचे धान्य द्यावे लागते. कधी कधी सावकार हाच दुकानदारही असतो. तेव्हा कुणाला कर्जाऊ पैसे रोख न देता, तो त्याला लागणारे जिन्नस महाग दराने उधारीवर देतो. या पद्धतीला पालेमोड म्हणतात. राजरोस लूटमार करण्यासाठी ह्या पद्धतीसारखी दुसरी राक्षसी पद्धती जगात असेल किंवा नाही याची शंका आहे! या पालेमोड पद्धतीचे बळी फक्त वनवासीच आहेत असे नाही. सर्व शेतकऱ्यांना ती नडत आहे. शेतकऱ्यांच्या जीवनाला लागलेली ती एक विषारी आणि सर्वनाशकारी कीड आहे. पण आधीच सर्व प्रकारच्या जुलूमजबरदस्तीने त्रस्त झालेल्या वनवासींना साहजिकच ती अधिक जाचते.

म्हणजे आश्विन महिन्यात शेतात जरी चांगले पीक आले तरी भाड्यापायी आणि उसनवारीच्या फेडीपायी

त्यातले अर्धे उत्पन्न निघून जाते. नंतर शेतीचा खंड आहेच. तो तर भरलाच पाहिजे. खळे झोडतानाच जमीनदाराचा माणूस तिथे हजर असतो. प्रथम शेठचा खंड, नंतर शेतकऱ्याच्या पोटाला, असा हा जमीनदारी पद्धतीतील कायदा फार कसोशीने पाळला जातो. खळ्यात दिसणारी धान्याची रास पाहून आशाळभूतपणाने वनवासी शेतकरी आनंदात असतो. पण तो आनंद फार थोडा वेळच टिकतो. लगेच त्याच्या नजरेसमोर शेठ किंवा त्याचा माणूस आणि त्या माणसाचा शेठ उभा राहतो, आणि आपली पोटाची तीव्र गरज त्याला स्पष्ट दिसत असूनही तो त्या दंडुक्याच्या धाकाने निमूटपणे आपल्या श्रमाचे फळ दुसऱ्यांच्या पदरात घालतो. आणि ते फळ दुसऱ्याने नेल्यामुळे हताश होऊन कपाळाला हात लावीत बसतो. ह्या ब्रम्हघोटाळ्यात ह्या वनवासींच्या पिढ्यान् पिढ्या गेल्या आहेत आतापर्यंत. आणि ही पद्धत म्हणजे एक स्वाभाविक निसर्गयोजनाच आहे, असे आम्ही मानू लागलो आहोत. या ब्रम्हघोटाळ्यातून सुटण्याचा मार्ग त्यांना तर दिसत नाहीच आणि दुसऱ्या कोणी अद्याप दाखवला नाही.

जंगलातील कामाचेही असेच. सरकारने, आता म्हणतात यांच्या कामाच्या मजुरीचे दर निश्चित करून दिले आहेत. पण प्रश्न असा की, आहे त्या नियमांप्रमाणे मजुरी त्यांच्या पदरी प्रत्यक्ष पडते का? या लोकांच्या अज्ञानाचा, परवशतेचा आणि दुर्बलतेचा गैरफायदा करून घेऊन त्यांना लुबाडण्याचीच दृष्टी वरिष्ठ वर्गाची असते. यात अतिषोयोक्ती नाही.

शहरांतून कारखान्यांच्या व्यवस्थेसाठी कायदे आहेत. कायद्याने कामाचे तास, मजुरीचे दर, वगैरे गोष्टीचे नियंत्रण केले जाते. कारखान्यांतील मजूर या वनवासी मजुरांपेक्षा किती तरी शहाणे व हुषार आहेत. आपल्या अडचणी दूर करू शकतात. तिथे बायकांना बाळंतपणाची रजा असते. पण हे हजारो मजूर जंगलात अहर्निश काम करतात; सरकारला लाखो रूपयांचे उत्पन्न करून देतात. सरकारच्या जंगलातील मालमत्तेचे रक्षण करतात. कंत्राटदारांची लाखो रूपयांची कामे करतात. त्यांच्या श्रमाने कंत्राटदारांना गाड्या-घोडे उडवायला मिळतात. माड्या-हवेल्या बांधता येतात. त्यांच्या मुलाबाळांना ऐषआरामात राहता येते. ज्या लोकांच्या श्रमाने एवढी चैन चालते पांढरपेशा वर्गाची, ज्या लोकांच्या श्रमाने एवढी संपत्ती निर्माण होते, त्या लोकांच्या, त्यांच्या पोराबाळांच्या योगक्षेमाची योग्य व्यवस्था करण्यासाठी ?नियम करणे हे सरकारचे कर्तव्य नाही काय ? सरकार गरीबाचे वाली म्हणून मानले जाते ना? वरील लक्षावधी रूपयांची संपत्ती उत्पन्न करण्यात किती कुटुंबे गारद झाली असतील, किती माणसांचा पाशवी शक्तीने बळी घेतला असेल, कितीकांना भुकेने तडफडून मरावे लागले असेल ! संपत्तीच्या वैभवमंदिराच्या पायात कित्येक निरपराधी देहांच्या रक्तमासाची भरणी घालावी लागली असेल ! सुशिक्षित श्रीमंतानी एका बाजूला झकझकीत शहरी संस्कृतीची मंदिरे उभारली आहेत, आणि दुसऱ्या बाजूला खेड्यांतून, जंगलांतून, दऱ्याखोऱ्यांतून, आपल्या सर्वभक्षक पाशवी तृष्णेला बळी पडलेल्या अगणित जीवांची थडगी बांधली आहेत.

कोठपर्यंत हे चालणार!

● ● ●

*('जंगलातील छाया' या पुस्तकातून साभार)*

# आदिवासी हस्तकलेचे व्यवसाय

**- उत्तमराव सोनवणे**

आदिवासींची हस्तकला त्यांच्या दैनंदिन गरजेतून निर्माण झालेली व परंपरेने चालत आलेली कला आहे. गरजेनुसार आदिवासी स्त:च्या वस्तू स्वत: बनवितो. अशा वस्तू निर्माण करणाऱ्या आदिवासीला आपण हस्तकला कौशल्याच्या क्षेत्रातील एक कारागीर आहोत याची जाणीवही नसते. वस्तुनिर्मितीचे काम आदिवासी अतिशय एकाग्रतेने करतात. त्यामुळे त्यांच्या हस्तकलांकडे पाहताना एक वेगळाच आनंद मिळतो व वेगळ्याच सौंदर्याची जाणीव त्यातून निर्माण होते. देवदेवतांच्या प्रतिमा तयार करणे, रोजच्या वापरातील वस्तूंची निर्मिती करणे, विविध प्रकारची वाद्ये व सौंदर्यवाढीसाठी विविध साधने तयार करणे यात आदिवासींना विशेष रस असतो. अशा प्रकाच्या विशेष आवडीतून आदिवासी हस्तकलेचा जन्म झालेला आहे. त्यांची ही कला परंपरागत चालत आली आहे. तिच्यात बदलही घडत आले आहेत. त्यातील गुण, कलात्मकता, सौंदर्य हे देखील काळानुरूप बदलत आहे. रोजच्या वापरातील हत्याराच्या व साहित्यांच्या सहाय्याने आदिवासी जवळपास मिळणाऱ्या साधनांचा उपयोग करून कलाकौशल्याचे दर्शन घडविणाऱ्या वस्तू तयार करतात. हे करीत असताना आदिवासी विशेषत: धार्मिकतेच्या परंपरागत कल्पना व श्रद्धा यांची सांगड घालतो. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास मृतांच्या स्मरणार्थ उभारावयाच्या शिणोलीचे देता येईल. लाकडी खांबावर केलेल्या कोरीव कामाचा तो अप्रतिम नमुना असतो. या खांबाचा आकार व उंची त्यावरील नक्षीकाम मृतांच्या सामाजिक प्रतिष्ठेनुसार कोरलेले असते. त्याचप्रमाणे मृतांचे देव म्हणजे पितर म्हणून तयार करावयाच्या 'वाघ्या' 'वीर' व 'सुपली' वगैरे पितरांच्या प्रतिमा, देवीच्या पूजेची 'झांगळी' वारल्यांचा 'तारपा' ,भिल्लांची लग्नबाशिंगाची टोपली, माडिया गोंडांचा 'मुंडा', माता, देवीचे घोडे 'बडादेवाची पालखी, माडिया 'तेलरिन कनसरी' व 'बहिरम' देवाच्या मूर्ती, सूर्यदेव, चंद्र देवाचे मुखवटे इत्यादी त्यांच्या कलाकौशल्यातील उदाहरणे म्हणून सांगता येतील. 'मुंडा' म्हणजे लग्नातील मध्यवर्ती कोरीव नक्षिदार लाकडी खांब. या खांबावर आदिवासी हस्तकलेचा आविष्कार पहावयास मिळतो. आदिवासी हस्तकलेचा उगम त्यांच्या धार्मिकतेतून झाला आहे हे त्यावरून दिसून येते.

**विविध प्रकार**

सभोवतालच्या परिसरातून उपलब्ध होणाऱ्या साधनांमधून आदिवासी हस्तकलेच्या वस्तू निर्माण करतात. निर्मितीकौशल्य, वस्तूचा रेखीवपणा व हस्तकलेचा प्रकार यांनुसार त्यांच्या हस्तकलेचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल:

(१) आदिवासींची विविध प्रकारची व आकारांची पारंपरिक वाद्ये.

(२) दागदागिने व शृंगार साधने (मण्यांच्या माळा, फण्या, वाद्ये)

(३) सुतारकाम, बांबुकाम व घरगुती उपयोगाच्या वस्तू.

(४) गवताच्या पिशव्या, टोप्या व विविध सौंदर्य प्रसाधने.

(५) लाकडावरील कोरीव काम व विविध प्रकारचे मुखवटे

(६) शिकारीची आयुधे, साधने व विविध प्रकारची जाळी.


(७) भिंतीवरील चित्रे व धार्मिक कार्यातील प्रासंगिक चित्रकला.

## महाराष्ट्रातील आदिवासी लोक तयार करत असलेली विविध वाद्ये व त्यांच्या निर्मितीसंबंधीची थोडक्यात माहिती.

| वापरावयाच्या वस्तू | निर्माण केली जाणारी वस्तू | विभाग |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| (अ) भोपळा, ताडपाने, बांबू, मेण इत्यादी. | तारपा | जव्हार ठाणे, मोखाडा ठाणे, तलासरी ठाणे, त्रिंबक नाशिक, हरसूल नाशिक. |
| | झांगळी | जुन्नर पुणे, अकोले अहमदनगर, जव्हार ठाणे, वाडा ठाणे, मोखाडा ठाणे, डहाणू ठाणे. |
| | बीरी | अक्कलकुवा धुळे, अक्राणी धुळे, चोपडा, जळगाव. |
| | पावरी | अक्कलकुवा धुळे, अक्राणी धुळे, शिरपूर धुळे, चोपडा जळगाव. |
| (ब) लाकूड, तार, प्राण्यांचे केस, कातडे माती इत्यादी | हिरोबाई, किंगरी, रोथ्या | परभणी, नांदेड, अक्राणी, धुळे, शिरपूर धुळे |
| | भिलड्रम | अक्राणी धुळे, अक्कलकुवा धुळे, नवापूर धुळे, नंदूरबार धुळे, शहादा धुळे, चोपडा जळगाव. |
| | बायसनहार्न डान्स ड्रम. | सिरोंचा, चंद्रपूर. |
| | ढिमकी | मेळघाट, अमरावती |
| | फरा | किनवट नांदेड, यवतमाळ केळापूर. |
| | सीत्रे | सिरोंचा, चंद्रपूर |
| | प्राण्यांच्या शिंगाचे बिगुल | सिरोंचा, चंद्रपूर |
| | ताडाच्या पानाचे बिगुल. | सिरोंचा चंद्रपूर. |
| | सनई, शहनाई | सिरोंचा चंद्रपूर. |
| | सारंग | चंद्रपूर सिरोंचा, राजूरा, चंद्रपूर. |
| | टप्पा, गप्पा | मेळघाट, अमरावती. |
| | चटकोरा टिचकुरी | गडचिरोली, सिरोंचा, चंद्रपूर. |

## पारंपरिक आदिवासी वाद्ये

आदिवासींना वाद्यांची विशेष आवड आहे. विविध प्रकारची व आकाराची वाद्ये तयार करण्याचा त्यांना छंदही आहे. जनावरे सांभाळणारा गुराखी मुलगा 'पावी अगर' 'तेंडूर' मोठ्या आवडीने वाजवितो. मोठी माणसे लांब भोपळ्याचा तारपा वाजवितात. रंगीबेरंगी वाखाच्या गोंड्यांनी, रंगीत मण्यांनी आणि पक्ष्यांच्या रंगीत पिसांनी आदिवासींची वाद्ये सजविलेली असतात. त्यांची वाद्ये तेच तयार करतात. आदिवासी निरनिराळ्या प्रसंगी, प्रसंगाला अनुरूप अशीच वाद्ये वाजवितात. त्यांच्या




**परधानाचे वाद्य बाना**

वाद्य प्रकारातून नवीन वाद्य आता सर्वत्र लोकप्रिय झाले आहे. 'विचित्रवाणी' हा वाद्य प्रकार आदिवासींच्या 'झांगळी', 'कहाळी' सारखाच आहे. साधी 'झांज' अगर भजनाचे 'टाळ घ्या? किती विविध प्रकारचे व आकाराचे टाळ आदिवासी बनवितात. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तहसीलमधील कोरकूचे लाकडी गप्पा, टप्पा, मंजिरा टिचकुरी हेही टाळाचेच प्रकार आहेत. भिल्लांच्या इंदल पूजेतील 'झामलो' हाही एक प्रकारचा टाळच आहे. शिवाय टप्पा हे वाद्य एकाच प्रकारचे नसते. चौकोनी, षटकोनी, गोल, भरीव, पोकळ असे टप्प्याचे अनेक आकार व प्रकार आहेत. माडिया गोंडाची टिचकरी हे वाद्य नृत्याचे वेळी आवाज करून साथ देण्यासाठी वाजविले जाते. लाकडास बाकदार पण धनुष्याकृती कोरून टिचकुरीच्या दोन्ही टोकांना गोल अगर चौकोनी आकार देतात. पावलांच्या लयबद्ध हालचालींना या वाद्याने साथ देता येते.

## दागदागिने

आदिवासी विभागांत विविध नमुन्यांचे दागदागिने दिसतात. धातूपासून तयार केलेले विविध घाटाचे दागदागिने सर्वच आदिवासी जमातीत वापरतात. परंतु धातूपासून बनविलेल्या दागदागिन्यांची आवड मात्र धुळे, जळगाव जिल्ह्यातील भिल्ल व मेळघाटच्या कोरकू जमातीत अधिक दिसते. भिल्ल, कोरकू, एवढीच धातूंच्या दागिन्यांची आवड गडचिरोली तहसीलमध्येही आढळते. इतर ठिकाणी मण्यांच्या माळांचा वापर अधिक केला जातो. भामरागड भागातील माडिया तरूणींच्या गळ्यात मण्यांचे नानाविध हार दिसतात. धातूचे निरनिराळे हार, साखळ्या जळगाव जिल्ह्यातील पावरा लोकांच्या, धडगाव भागातील मथवाडी भिल्ल स्त्रियांच्या अंगावर दिसतत. 'कालमुघ्या' व 'कथिमुद्या' सारख्या चित्रविचित्र 'हसली' सध्या चंद्रपूर जिल्ह्यात पहावयास मिळतात. लहान मुलांच्या कमरेला 'करदोडा' बांधलेला असतो त्यातही आदिवासींची सौंदर्यदृष्टी असते. करदोड्यात लहान लहान नाजूक आवाजाची घुंगरे बांधलेली असतात, माडिया गोंड नृत्यासाठी घुंगराचे विविध पट्टे बनवितात. गुजराथ सीमेलगतच्या भिल्लांमध्ये गवताचे विविध पट्टे बनवितात. गुजराथ सीमेलगतच्या भिल्लांमध्ये गवताचे विविध दागदागिने तयार करतात. त्यांचे सूबक आकार पाहून भिल्ल लोक असे नयनमनोहर दागिने बनवितात हे कोणाला खरे देखील वाटणार नाही. राठवा, भिल्ल, कोरकू, गोंड, हलवा, कोलाम यांच्या भागात दागिने घडविण्याचे काम केले जाते. पारंपरिक घडण आता मागे पडू लागली आहे व धंदेवाईक लोकांनी आदिवासींची ही कला उचलली आहे. गडचिरोली तालुक्यातील कोरचीच्या आठवडे बाजारात मेळघाट-मधील हरिसालच्या आठवडे बाजारात, काही दुकाने

आदिवासीचे दाग दागिने




केवळ आदिवासींचे दागदागिने विकणारी असतात. मध्य प्रदेशातील बैतुल जिल्ह्यातील भैसदेहीहून ८०-९० मैल व इतर ठिकाणांहूनही केवळ दागिने विकण्यासाठी येणारे सोनार, ओतारी, अतार यांची संख्या कितीतरी असते. अनेक प्रकारच्या 'मुंदी' म्हणजे आंगठ्या बाजारात पहावयास मिळतात. आदिवासींचे स्वत:चे सोनार होते त्यांना 'ओझा' म्हटले जाई, घटुवा पद्धतीने ते दागिने बनवितात. आधुनिक बाजारातील स्पर्धेत ते आता मागे पडले आहेत. निरनिराळ्या आकाराच्या फण्या आदिवासी स्वत:च तयार करीत. चंद्रपूर जिल्ह्यात अशा फण्यांचे विविध प्रकार आजही पहावयास मिळतात.

**घरासाठी साधने व घरगुती उपयोगाच्या वस्तू**

आदिवासींच्या घराघरांत त्यांच्या हस्तकलेचे नमुने आढळतात. ठाकर, कातकऱ्यांच्या झोपड्या उभ्या आडव्या कारवीच्या कुंडाच्या, पळस, सागांची पाने व गवताने शाकारलेल्या असतात. महादेव कोळी, कोकणा आणि भिल्लांच्या घरांसाठी भरपूर लाकडाचा वापर केलेला असतो. कोरकूंची घरे मात्र निराळ्या पद्धतीने बांधलेली असतात. चार लांब भिंती त्यांना 'कंबर' म्हणतात. त्याच्या सहाय्याने तीन लांबट खोल्या काढलेल्या असतात. पुढची व मागची खोली मधलीपेक्षा अरूंद असते व छप्पर उतरते असते. भिंती माती व भाताच्या काड्याच्या चिखलगाऱ्यापासून थापून उभ्या केलेल्या असतात. घर बांधण्यासाठी पाथरवट मुद्दाम बोलवण्यात येतो. हलबांची घरेही अशीच परंतु लांबीने कमी पण उच असतात. घराच्या बाहेरच्या भिंती कोरून त्यांना विविध आकार दिलेले असतात. भिंती शाडूने सारवून त्यांवर गेरूने चित्रे काढलेली असतात. हलब्यांच्या घरांसाठी वापरलेल्या लाकडावर प्राण्यांची, वनस्पतींची सुंदर चित्रे व निरनिराळे आकार व विविध नक्षीकाम केलेले असते. गडाच्या अधिपतींची घरे कलाकौशल्यांच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. विविध प्रकारचे कोरीव काम येथे पहावयास मिळते. अशा प्रकारची लाकडी कोरीव कामे केलेली घरे 'मोखाडा' तहसीलमध्ये व नवापूर, अक्कलकुवा व सुरगाणा तहसीलमध्ये पहावयास मिळतात. भिल्लांच्या घरांवर प्राण्यांचे आकार बसविलेले असतात. आदिवासींच्या घरगुती उपयोगाच्या वस्तूंमध्ये मातीच्या भाड्याचा वापर

अधिक आढळतो. बाडगी, माठ, तवा, इत्यादींचा त्यामध्ये समावेश होतो. मातीची भाजणी चमकदार काळा रंग येईपर्यंत केलेली असते. धानोऱ्याला भांड्यांची पुढीलप्रमाणे पद्धत पहावयास मिळते. प्रथम माती चाळून घेतात. नंतर दोन-तीन दिवस पाणी घालून माती पातळ करून ठेवून देतात. तिसऱ्या दिवशी ती उपसून उघड्यावर सावलीत पसरून फेकतात व चांगली सुकू देतात. चौथ्या दिवशी सकाळीच तुडवून त्याचा नरम व मऊ गारा करतात. व त्यांनतर तिच्यापासून विविध आकार देऊन वस्तू व वस्तूंवरील नक्षीकाम केले जाते.

मातीच्या भांड्याबरोबरच आजूबाजूस सापडणाऱ्या भोपळ्यांचा उपयोगही आदिवासी भांड्यासारखा करतात. झऱ्यातून पाणी उपसून घेण्यासाठी, पाणी पिण्यासाठी, ताडी, गोरगा झाडावरून काढण्यासाठी, तेल ठेवण्यासाठी, आणि जंगलात पाणी नेण्यासाठी भोपळ्यांचा उपयोग होतो. पाण्यासाठीच्या भोपळ्याभोवती बांबूच्या बारीक कामट्यांनी विणून घेतात किंवा झाडाच्या सालींनी विणून घेतात. बारीक देठाच्या लांब व शेवटी फुगीर आकाराच्या भोपळ्यांना फुगीर ठिकाणी गोल भोक पाडून आतील गर व बीया काढून टाकतात. अशा भोपळ्यांना देठाकडे लहान भोक पाडतात. याचे अनेक उपयोग केले जातात. मद्यपानासाठी याचा उपयोग केला जातो. भिल्ल लोक अशाच भोपळ्याची गुडगुडी करतात. आदिवासी झाडांच्या पानांचे द्रोण व पत्रावळ्या सहजतेने बनवितात. मेळघाटमधील कोरकू धान्य साठविण्यासाठी मातीचे साठवण तयार करतात. तसेच धान्य भरडण्यासाठी मातीची जत्ती किंवा 'घीसी' नावाचे जातेही तयार करतात. धान, कोसगी, नागली इत्यादी धान्यांची टरफले काढण्यासाठी जत्तीचा उपयोग होतो. अशा प्रकारची लाकडी जाती ठाणे, नाशिक, जळगाव भागातील आदिवासी वापरतात. घरगुती वस्तूंमध्ये खाटांचे अनेक प्रकार आढळतात. माडिया गोंडांच्या 'बाजा' बांबूच्याच असतात.




### बांबूकामातील हस्त कौशल्य

| प्रकार | निर्माण झालेली वस्तू | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| वाद्ये | पाऊल(पावा) | केळापूर, वणी. | यवतमाळ |
| पावसाची छत्री | रेखी | एटापल्ली,भामरागड भाग | गडचिरोली |
| | इरले | जव्हार | ठाणे |
| | | मोखाडा | ठाणे |
| | | तलासरी | ठाणे |
| | | सुरगणा | ठाणे |
| | | जुन्नर | पुणे |
| | | आंबेगाव | पुणे |
| | | अकोला | नगर |
| | | अकोला व इतरत्र | नगर |
| मासे पकडण्याचे साधन | तेलेडुंका, भोतड, साटा भोतड व इतर फास. | सिरोंचा | गडचिरोली, ठाणे, नाशिक |
| | टोपल्या | सर्वत्र आदिवासी विभागात. | धुळे, जळगाव, चंद्रपूर, अमरावती. |
| | पक्षी पकडण्याचे फासे | सिरोंचा | गडचिरोली |
| | धनुष्यबाण | सिरोंचा | गडचिरोली |
| | | चोपडा | जळगाव |
| | | अक्रणी | धुळे |
| | फण्या | सिरोंचा | गडचिरोली |


जीणही बांबूच्या पातळ पट्यांची असते. झाडांच्या ओल्या सालींनी विणलेल्या खाटाही हे लोक वापरतात. अशा खाटा विणताना विविध प्रकारचे नक्षीकाम केलेले असते. नक्षीकामाच्या रेषा आणि विण यांनी तयार झालेल्या सुंदर सुंदर आकृत्या मनोवेधक असतात. बांबूची भांडीही करून वापरतात. आदिवासी क्षेत्रात बांबूच्या विविध आकाराच्या टोपल्या सर्वत्र बनविल्या जातात.

**बांबूकाम**

बांबूकाम ही एक आदिवासींची हस्तकला आहे. आदिवासींनी बांबूच्या बनविलेल्या टोपल्यांचा आकार व विणकाम या सर्व दृष्टीने बांबूकाम अप्रतिम असते. आणि विविध उपयोगांच्या विविध टोपल्या ते तयार करतात. त्यांना 'साकुरी', 'विट्या', 'फलोरी', 'हेटे साकुरी' म्हणतात. आदिवासींच्या या हस्तकला व्यवसायाचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे.



डवाल्या



टोपली



मुड्या

आदिवासी विविध प्रकारचे धनुष्यबाण बाबूंपासून बनवितात. बाबूंच्या छामट्यांनी विणलेल्या तट्या घरांच्या भिंतीसाठी उपयोगाला येतो. बांबूची भांडीही आदिवासी बनवितात. शिकारीच्या अनेक हत्यारात बांबूच्या साधनांचा उपयोग होतो. 'तेलेडुंका' हे एक असेच माडिया गोंडाचे मासे पकडण्याचे साधन चार-पाच फूट लांबीच्या पोकळ बांबूपासून हे बनविलेले असते. एक बांबू चिरून अनेक कांबी केलेल्या असतात. या चिरलेल्या 'छामट्या' दोऱ्याने अगर वाखाच्या बारीक दोरीने विशिष्ट पद्धतीने विणून घेतात. तर दुसरी बाजू अखंड असते. हस्तकौशल्य व विविधता याद्दष्टीने खालील भागात ही हस्तकला आढळून येते.

मण्यांच्या माळा बनविण्याची आवड आदिवासींत आहे. गळ्यात, फेट्यावर, कपाळावर, हातात, केसांवर, कमरेला बांधण्यासाठी आदिवासी ''मण्यांच्या माळा'' तयार करतात. लाकडी मणी आदिवासी घरीच तयार करतात. लहान फळांच्या 'बिया' व रंगीबेरंगी दगड जंगलातून जमवून त्याचाही ते वापर करतात. नकली मणी आठवडे बाजारातून ते विकत आणतात. मणी आवडीनुसार रंगीबेरंगी दोऱ्यात ओवतात. 'डुम्मे' ''गोपीन डुम्मे'', ''मुंगे'', ''मोतीने डुम्मे'' असे मण्यांच्या माळांचे प्रकार आदिवासी तयार करतात.

''फण्या'' आणि ''डब्या'' बनविण्यात माडिया गोंड कुशल आहेत. माडिया गोंड तरूण-तरूणींमध्ये ''हिचाडी-फणी'' ही प्रेमाचे प्रतिक समजली जाते. त्यामुळे माडिया तरूण-तरूणी अशा फण्या जास्तीत जास्त आकर्षक आणि कलात्मक बनविण्याचा प्रयत्न करतात. बांबूच्या लहान पातळ कांबी एका टोकास दोऱ्याने बांधून फणी तयार केली जाते. फण्यांच्या अनेक प्रकारात ही बांधावयास अवघड परंतु दिसण्यात आकर्षक असते.

माडिया गोंड जमातीत तंबाखूच्या डब्याही बनवितात. चंद्रपूर जिल्ह्यात एटापल्ली भामरागड भागात अशा डब्या घरोघरी आढळून येतात. अशा डब्यासाठी लाकूड कोरून वरील भागावर नक्षीकाम केले जाते. शिशाच्या रसांचा पातळ मुलामा डबीवर दिला जातो. त्यामुळे ती भक्कम होते. माडिया लोक धातूंच्याही डब्या बनवितात. विविध प्रकारच्या नक्षीने नटलेल्या डब्या पाहून त्यांच्या कलाकौशल्याची प्रचिती येते. कठिण कवचाच्या फळांचा उपयोगही डब्यांसाठी केला जातो. ''कोरकू'' लोकही

अशा प्रकारच्या डब्या बनवितात.

### गवताच्या टोप्या, पिशव्या इ. वस्तू

ठाणे जिल्हयातील जव्हार भागात वारली व कोकणा जमातीची मुले गवता-तणापासून विणून टोप्या बनवितात. ''फेल्टहॅट'' सारख्याच या टोप्या दिसतात. गवताची चमकदार सोनेरी झाक त्यावर असते. टोप्यांप्रमाणे ''टोकरीच्या'' आकाराच्या लहान लहान पिशव्याही गवतापासून बनविल्या जातात. नाशिक जिल्ह्यातील पेठ भागात असे कारागीर आहेत. 'लेडिज पर्स' म्हणून याचा उपयोग सहज होऊ शकेल. गवताच्या काड्यांची खेळणीही आदिवासी लोक तयार करतात. त्याचप्रमाणे अनेकविध तोरणेही बनवितात. घरांत शोभेसाठी ठाणे जिल्ह्यातील आदिवासी तांदळाच्या लोंब्या व गवताचे तुरे यांच्या सुरेख आकृती बनवितात. चंद्रपूर जिल्ह्यात शिंदीच्या पानांच्या सुरेख मुंडावळ्या बनवितात. गवताच्या चुंबळही तयार केल्या जातात.

### लाकडावरील कोरीव काम

लाकडावरील कोरीव कामात महाराष्ट्रातील अनेक आदिवासींचे कौशल्य दिसते. पांगाऱ्याचे लाकूड कोरून वारली व कोकणा 'भवाड्याचे' मुखवटे तयार करतात. घरासाठी वापरावयाचे लाकडावर हलबा लोक नक्षीकाम करतात. पक्षी व प्राण्यांचे आकार कोरतात. गोंड व माडिया गोंड आणि कोरकू लग्न समारंभासाठी मध्यवर्ती खांब ''मुंडा'' तयार करतात. त्यावर विविध प्रकारचे कोरीव काम करतात. मृतांच्या स्मरणार्थ उभारावयाची स्मारके 'शिणोली' 'मरसिंग मुंडा'' निरनिराळ्या आकाराचे असतात. वाघ्या दैवत करण्यासाठी लाकडावर कोरीव काम केलेले असते. वाघ्या दैवत करण्यासाठी लाकडावर कोरीव काम केलेले असते. अशा प्रकारे अनेकविध आकार व प्रकारच्या लाकडी कोरीव वस्तू आदिवासी करीत असतात. हस्तकला व्यवसायातील



**चंद्रदेवतेचा मुखवटा**

आदिवासींची कुशलता मोठी आहे. ती लक्षात घेऊन मध्य प्रदेशातील जगदालपूर येथे श्री. अरूण गुहा यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सहाय्याने ''डान्सिंग कॅकटूस' नावाची संस्था सुरू केली आहे. लाकडी कोरीव कामात वाकबगार असलेल्या माडिया, मुरिया आदिवासींना इथे प्रशिक्षण, प्रशिक्षित शिक्षकांचे मार्गदर्शनाखाली दिले जाते. आदिवासी पुरूष एकटा प्रशिक्षणाला निवडला जात नाही. त्या आदिवासीचे सारे कुटुंबच या संस्थेत बोलावले जाते. आणि त्या कुटुंबाला प्रशिक्षण दिले जाते. १९६० पासून आतापर्यंत नॅशनल हँडिक्रॅफ्ट टॅलेंट स्पर्धामध्ये लाकडी कोरीव कामासाठी पहिल्या क्रमांकाची १६ विविध बक्षिसे या संस्थेच्या विद्यार्थ्यांना मिळाली आहेत. महाराष्ट्रातील आदिवासींची ही कला जोपासण्यास देखील वाव आहे :

या हस्तकला कौशल्याची महाराष्ट्रातील काही ठिकाणे खाली दिली आहेत :

| निर्माण झालेली वस्तू | तहसील | जिल्हा |
|---|---|---|
| (१) तंबाखूच्या डब्या, पोआ, 'तिद्दाणा घोटा' | सिरोंचा | चंद्रपूर |
| (२) 'मुंडा' लग्न खांब | मेळघाट | अमरावती |
| | गडचिरोली | चंद्रपूर |
| | राजूरा | चंद्रपूर |
| | सिरोंचा | चंद्रपूर |
| (३) फण्या 'हिचाडी' | सिरोंचा | चंद्रपूर |
| (४) 'शिणोली' मृताच्या स्मरणार्थ उभारावयाचे खांब | मेळघाट | अमरावती |
| | सिरोंचा | चंद्रपूर |
| (५) मुखवटे, | अक्राणी | धुळे |
| | पेठ | नाशिक |
| | चोपडा | जळगाव |
| (६) घरासाठी लाकडी कोरीव काम | गडचिरोली | चंद्रपूर |
| | साकोली | भंडारा |

आदिवासी हस्तकला कौशल्याच्या काही अंगांचा वर उल्लेख केला आहे. याशिवाय शेतातली बुजगावणी तयार करण्यात त्यांच्यामध्ये कला कौशल्याच्या दृष्टीने वाखाणण्याजोगी विविधता आढळून येते. शिकारीची विविध हत्यारेही महाराष्ट्रातील आदिवासी तयार करतात. आदिवासी हस्तकला कौशल्यात मातीच्या देवता व लाकडी आणि मातीच्या प्राण्यांचा उल्लेख करावा लागेल. मेळघाट भागात दिवाळीच्या दिवसात मातीचे हत्ती बनवून त्यावर छोट्याछोट्या पणत्या बसविलेल्या दिसतात. यवतमाळ जिल्हयात वणी व चंद्रपूर जिल्ह्यात गडचिरोली व सिरोंचा तहसीलामध्ये देवीस अर्पण करण्यासाठी मातीचे हत्ती, घोडे, बैल इत्यादी प्राणी तयार करतात. मातीचे देव धुळे व नाशिक जिल्ह्यात तयार केले जातात.


आदिवासींची चित्रकला ही सूचित (सांकेतिक) चित्रकला आहे. आदिवासी सहसा हेतूशिवाय चित्र काढीत नाहीत. भिंतीवर काढावयाची चित्रे आदिवासी जमातीच्या हेतू व संकेतानुसार ठरलेली असतात. भरपूर पावसाळा येण्यासाठी बेडकाची चित्रे ते रंगवतील तर दुष्टात्म्यास घरापासून दर ठेवण्यासाठी 'सूर्यदेव' 'चंद्रदेव' यांची चित्रे रंगवतील. मेळघाटमधील कोरकुंमध्ये स्वस्तिक फार प्रिय आहे. गडचिरोलीमध्ये 'बडादेव' प्रिय आहे. आदिवासीच्या चित्रकलेत खालील नमुने आढळतात.


(१) भिंतीवरील चित्रकला,


(२) गोणपाटावरील चित्रकला,

(३) धार्मिक विधीच्या वेळी धान्याने काढलेली चित्रे.

अंगावरील 'गोंदण' हाही चित्रकलेचाच एक प्रकार







आहे. डहाणू तालुक्यातील आदिवासी तरूणांस चित्रकलेच्या क्षेत्रात राष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे व त्यांच्या अनेक चित्रांची आर्ट गॅलऱ्यांमधून प्रदर्शने झालेली आहेत. आदिवासींच्या घरांच्या भिंतीवर अशी चित्रे पहावयास मिळतात. ठाणे जिल्ह्यात डहाणू, तलासरी, मोखाडा; नाशिक जिल्हयात सुरगाणा, बागलाण तालुक्याचा साल्हेर मुल्हेरचा भाग; धुळे जिल्हयात अक्राणी महाल; अमरावती जिल्ह्यात मेळघाट; चंद्रपूर जिल्हयात गडचिरोली व भंडारा जिल्ह्यातील साकोली तहसीलमध्ये आदिवासींच्या चित्रकलेचे विविध नमुने पहावयास मिळतात.

आदिवासींच्या हस्तकलांच्या संदर्भात आणखी एका कलेचा उल्लेख अपरिहार्य आहे. 'भावाडा' या नृत्य प्रकारासाठी कागदाचे विविध मुखवटे ठाणे, नाशिक जिल्ह्यांत बनविले जातात. आदिवासी नृत्यांमध्ये मुखवटे सर्वत्र वापरतात. भोपळे रंगवून, लाकडे कोरून असे मुखवटे तयार केले जातात. मुखवटे वापरून सोंगे घेण्याची आवड त्यांना आहे. कागदाचे मुखवटे बनविण्याची त्यांची हस्तकला विशेष प्रयासाची व कौशल्याची आहे. रद्दी कागद साधारणत: २५ ते ३० दिवस भिजत ठेवतात. भिजलेल्या कागदामध्ये मेथा भिजवून घालतात. हे मिश्रण चांगले कुटून घेऊन त्याचा लगदा तयार करतात. घावड्याच्या थोडा डिंकही त्यात वापरतात. हा लगदा तयार झाल्यावर निव्वळ कल्पनेतील आकार ते तयार करतात. ही हस्तकला आता मागे पडू लागली आहे. निसर्गात निर्माण होणाऱ्या रंगाची जागा आता रासायनिक रंग घेऊ लागले आहेत.

आजच्या आधुनिक जगात यंत्राच्या सहाय्याने निर्माण केल्या जाणाऱ्या वस्तूंमुळे सर्व क्षेत्रात क्रांती झालेली आहे. अशा वस्तूंचा शिरकाव आदिवासी भागातही झालेला आहे. आदिवासी गरजेनुरूप वस्तू बनवित आला. आता तो गरजेनुरूप बाजारात वस्तु शोधताना दिसू लागला आहे. स्वत:वर तो अवलंबून होता, तो आता हळूहळू परावलंबी होत आहे. यंत्रनिर्मित वस्तूंकडे आदिवासी आकर्षित होत आहे व त्यामुळे त्याच्या पारंपरिक हस्तकलांकडे दुर्लक्ष होत आहे. बाजारी वस्तूंमुळे तो परिश्रम करण्यास तयार होत नाही असे आढळून येते. आदिवासींची हस्तकला आदिवासींमध्ये उदासीनता व कृत्रिम आकर्षणता निर्माण झाली तर, हळहळू नष्ट होत जाईल. त्यासाठी महाराष्ट्र 'डान्सिंग कॅकट्स' सारख्या संस्था उभारावयाची गरज आहे.

● ● ●

*(लोकराज्य अदिवासी विकास विशेषांका मधून सादर)*

# परधान

**- शैलजा देवगावकर**

धर्मगुरू व प्रधान (मंत्री) या नात्याने वागणारा गोंडाचाच एक विभाग म्हणजे परधान जमात होय. गोंडांच्या वंशावळी ठेवण्याचे काम परधान पूर्वी करीत असत. सणांना गोंडाकडे त्याला बोलावणे असे. लग्न समारंभात त्यांची मध्यस्थी असे. ते स्वत:ला चंद्राच्या वंशातले समजतात. पाटाडीपाटा-(गाणे)-परधान म्हणजे गाणे म्हणणारे-भाट अशीही व्युत्पत्ती आढळते. पना म्हणजे पाहुणा-परधान अशी उपपत्ती आहे. डॉ. भाऊ मांडवकरच्या मते 'परक्याचे धानावर जगणारा म्हणून परधान' अशी व्युत्पत्ति आहे. परधानांना परगणिया (परगणा-प्रांताचा प्रमुख), देसाई (कर वसूल करणारा महसूल.) आणि पठारी (पठारावर राहणारा) अशीही नामाभिधाने आढळून येतात. यवतमाळ आणि आदिलाबाद या जिल्ह्यात प्रामुख्याने त्यांची वस्ती आहे. सांस्कृतिकरणाच्या टप्प्यात ही जमात बरीच पुढे निघून आलेली आहे.

परधानांचे राज परधान, गांडा परधान आणि थोटी परधान अशा उपजमाती आहेत. नर्मदेच्या खोऱ्यात राजनेंगी व गोगिया असे दोन भेद आहेत. बुद्धिमान आणि हुशार असलेली ही जमात दिसायला व्यवस्थित आहे. गोंडाचेच त्यांच्यातही गुणधर्म आढळून येतात. पोशाखात आता धोतर-मुंडासे जाऊन पायजामा, पँट व शर्ट आलेत. स्त्रिया ५ वार व ९ वार साडीं नेसतात व पोलके घालतात. पूर्वी फक्त पदर अंगावर घेत. आता सामान्यत: साडीचाच पदर पोशाख सर्वदूर आहे. स्त्रिया देखण्या असतात. गोंदण्याची प्रथा आहे.

लोककथांमधून परधानांविषयी भरपूर माहिती उपलब्ध आहे.

गोंड आणि गोंडीणला सहा मुले होती. ते दोघे शेताची राखण करीत असत. सातव्या मुलाच्या वेळी गोंडीण शेतात प्रसूत झाली. घराच्या बाहेर या मुलाचा जन्म झाला म्हणून तो परधान.

तसेच एकदा देवाला प्रसन्न करण्यासाठी सातही भावांनी देवाची प्रार्थना केली. सहा भावांना काही तो प्रसन्न झाला नाही. पण सातव्या भावाने आपल्या 'बना' वाद्याने देवाला प्रार्थना करून प्रसन्न केले. देवदर्शन ज्याला घडले तोच परधानांचा पूर्वज. 'बना' वाद्यावर परधान निरतिशय प्रेम करतो व श्रद्धा ठेवतो. रोज सकाळी उठून बना वाद्य वाजवून स्तोत्रे म्हणणारे वृद्ध परधान आजही आहेत.

**परधानांच्या जीवन चक्रातील विधी**

आजही परधान आपल्या श्रद्धा आणि परंपरांचे पालन करताना आढळून येतात.

मूल जन्माला आल्यानंतर सुईणीकडून नाळ कापतात. मुलगा झाल्यास अंगणात भाला रोवतात व क्षत्रिय जन्माला आला म्हणतात. मुलगी झाल्यास मुलीच्या आईच्या माहेरी भाला ठेवतात. ६ व्या दिवशी सटीची पूजा करतात. शेजारच्या स्त्रियांना जेवण व दारू देतात. मुलाचा मामा मुलाच्या डोक्याचे मागचे दोन व पुढचे दोन केस कापतो व १२ व्या दिवशी बारसे करतो. आधुनिक नावांचाही अंतर्भाव झालेला दिसून येतो. पहिले बाळंतपण वडिलांचे घरी होते. ५ व्या दिवशी तीळ व गूळ वाटतात. १२ दिवस विटाळ मानतात.

मुलगी वयात येताना पहिल्या मासिक पाळीच्या नंतर चवथ्या दिवशी तिला नवीन कपडे शिवतात. तिची हळद, तांदूळ व नारळाने ओटी भरतात. मुलगी वयात

आल्यानंतर विवाह होतो. विवाह सगोत्री करीत नाही. वराच्या घरी विवाह होतो. वडील लोकच विवाह ठरवितात, मात्र मुला मुलीच्या पसंतीला प्राधान्य असते. वधू मूल्याची प्रथा आहे. गावप्रमुख कपडे, धान्य, (डाळ, तांदूळ) मीठ, दारू रोख रक्कम इ. किती द्यायचे ते सभा बोलावून ठरवितो. दारू व तंबाखू देण्याची प्रथा आहे. पाच पाच दिवस विवाहविधी चालतात. त्यात हळद लावणे, कुल देवतांची पूजा इ. विधी असतात. वधूमूल्य देता येत नसल्यास सासऱ्याच्या घरी राहून त्याची सेवा करतात. त्यास 'लमजान्या' असे म्हणतात. विवाह चैत्र, वैशाख किंवा फाल्गुन महिन्यात करतात. सोमवार, मंगळवार, शनिवार अशुभ दिवस समजतात. विधवा विवाह व पुनर्विवाह आहे.

'भगवान' ही त्यांची मृत्यू देवता. मरणाऱ्या व्यक्तींच्या तोंडात रूपया व दही टाकतात. शोकगीते गातात. दफन आणि दहन दोन्ही प्रथा आहे. दफन केल्यास प्रत्येक गावकरी सिवला झाडाची फांदी किंवा पळसाची पाने टाकतात. परत येताना नदीवर स्नान करून येतात. घरातही शेजारून विस्तव आणतात व स्नान करून शुद्ध होतात. तीन दिवस सुतक पाळतात. 'परशानपेन' (महादेव) ची प्रार्थना व पूजा करतात व मृताला शुभेच्छा देतात.

विविध प्रकारचे सण व उत्सव परधान लोकांमध्ये आहे. वडादेव पूजन हा त्यांचा मोठा सण आहे. त्यादिवशीं दारू व मासे यांचा नैवेद्य. व 'माशापासून आम्ही ज्याप्रमाणे काटे दूर करतो तसेच तू आमच्यापासून संकटांना दूर कर.' अशी देवाची प्रार्थना करतात.

सण उत्सवाच्या वेळी घरातील स्त्री ऋतुमती नसावी असा त्यांचा कटाक्ष असतो. वैशाख शुद्ध तृतीयेला 'एकोती उत्सव' साजरा करतात. पाऊस व पिके ह्यांना शुभ शकुन व्हावा म्हणून बाहुला-बाहुलीचे लग्न करून हा सण साजरा करतात.

आषाढ महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात 'हरेली उत्सव' साजरा करतात. 'कोदों माते, तू चांगली-वाढ' अशी प्रार्थना करतात. गाई-गुरांना मीठ चारतात.

'नवा उत्सव' श्रावण अखेर नवान्न भक्षणासाठी देवाला व पितरांना निमंत्रण देतात. देवाचा प्रसाद म्हणून भात व दारू सर्वांना वाटतात.

दसरा दिवाळी देखील साजरी करतात पण शिमगा (होळी) हा त्यांचा लोकप्रिय व अतिशय उत्साहाने साजरा करण्यात येणारा सण आहे. होळीची गाणी म्हणत मोठ्या प्रमाणावर होळी साजरी करतात.

परधानाचे 'बना' वाद्य तयार करणे हाही एक मोठा विधीयुक्त सण आहे. बना बनविण्यासाठी लाकूड आणावयास जाताना जाणारा दिवसभर उपवास करतो. मग एकटे एक झाड निवडतो. त्याला कोंबडीचे पिलू बळी देतो. दुसऱ्या दिवशी लाकूड आणून रातमाई, रातलिंगो, श्रियाल लिंगो इ. देवांची गाणी म्हणत वाद्य बनवितो. मोरपिसे, घुंगरू लावून बना सजवितो. दरवर्षी बडार्चन व बना ह्यांच्या प्रित्यर्थ एक लाल कोंबडी बळीं देतात.

'भगवान' आणि 'बडार्पन' या प्रमुख देवता आहेत. 'बडार्पन' ला कुठे कुठे 'बुऱ्हा पेन', 'बुढा पेन' म्हणतात. हा देव अरण्यात 'सजा' वृक्षावर राहतो. याशिवाय बन्स, बोरन, मरीदेव हे दुष्ट देवही आहेत.

भगताला 'गुणिया' किंवा 'पंडा' असे म्हणतात. देवतेला संतुष्ट करणे, रोग-राईचे कारण शोधून काढणे, बळी चढविणे अशा प्रकारची विविध कामे भगत करतो. तसेच औषधी गुणांनी युक्त मुळ्यांची त्याला माहिती असते तेही काम तो करतो.

शकून-अपशकुनावर त्यांचा विश्वास आहे. मांजर आडवी जाणे, रिकामे भांडे घेतलेली स्त्री, शिकणे हे अपशकुन तसेच निळकंठ पक्षी, आडवा गेलेला कोल्हा, गाय वासरू हे शुभशकुन समजतात. पुनर्जन्म, मृत आत्मा इ. त्यांचा विश्वास आहे.

(पान नं. ४२ वर)

# माडिया जमात आणि गोंड

- म. रा. बडवे

हजारो वर्षापासून ह्या निसर्गरम्य घनदाट अरण्याचे सावलीत, ह्या आदिवासी जमाती ह्या भू-प्रदेशात राहत आहेत. इंद्रावतीचे परिसरात माडिया जमात अजूनही पहिल्या शतकात वावरत आहे, तर गोदा, कृष्णा आणि पैनगंगा ह्या पुण्यपावन नद्यांच्या परिसरात गोंड जमात फुलते आहे. गोंड जमात जुने वस्त्र सोडून नवे वस्त्र परिधान करीत आहे, पण माडिया मात्र जुने तेच सोने समजून तिची जपणूक करीत आहे. हे पाहून मनाला अचंबा वाटल्यावाचून राहत नाही. ह्या दोन जमाती अगदी शेजारी राहून त्यांची संस्कृती रूढी, परंपरा, चाली रीती ह्या कशा भिन्न आहेत ते पुढील तक्त्यात पाहू.



काही ठळक चालीरीती, रूढी, परंपरा व राहणीमान दाखवून ह्या दोन जमातीमधील संस्कृतीची भिन्नता दाखविण्याचा प्रयत्न करून पाहिला आहे. हे असे का असावे हा त्या मागील हेतू आहे. माडियात गोंड जमातीचेच पद्धतीवर बंधुसमूह आधारलेला आहे. माडियांची स्वतंत्र आहेत. गोंड जमातीसारखाच कुळाचा, आडनाव म्हणून उपयोग करतात. हीच काय ती गोंड जमातीची जुळणारी साम्यता आहे. बाकीच्या चालीरीती व रूढीपरंपरा गोंड जमातीशी भिन्नता दर्शविते.

गोंड जमात माडियांना हा आपलाच गोंड समाज आहे असे त्यांना मनापासून वाटत नाही. काही गोंड लोक माडियांना ही एक गोंडाचीच शाखा असे समजतात. तर काही लोक त्यांना फक्त माडियाच समजतात. गोंड लोक माडियांना कमी दर्जाचे समजतात. माडियांचे घरी गोंड लोक माडियांना कमी दर्जाचे समजतात. माडियांचे घरी गोंड लोक खात-पीत नाही, ह्या सर्वांचे कारण हेच आहे की, माडियांत गोंडांच्या कोणत्याच चालीरीती नाही. त्यांचे राहणीमानही गोंड जमातीशी मिळते जुळते नाही.

आदिवासी किंवा गोंड म्हटले की, एक चित्र डोळ्यासमोर उभे राहते. परंतु वरील तुलनात्मक फरक वाचल्यावर वाचकांना आदिवासी लोकात त्या किती भिन्न-भिन्न आहे याची कल्पना येते. मात्र येथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, गोंड जमात ही माडियांपेक्षा पुष्कळ बाबतीत तुलनात्मक दृष्टीने सुधारलेली आहे.

| संस्कृती, रूढीपरंपरा आणि चालीरीती | | माडिया जमाती | गोंड जमात |
|---|---|---|---|
| १. | बंधु समूह | चार,पाच, सहा व सात | चार,सहा व सात |
| २. | गोत्र(कुळ) | २३%कुळ गोंड जमातीचे माडिया जमातीत आहे ७७% कुळ गोंड जमातीत नाही. | २३% कुळ माडिया जमातीत आहे. |
| ३. | आडनाव (उपनाव) | कुळाचाच आडनाव म्हणून उपयोग करतात. | कुळाचाच आडनाव म्हणून उपयोग करतात. |
| (अ) | वंशावळ. | नाही | आहे |
| ४. | देव. | बडादेव(कोणत्याच देवाची नावे माहीत नाही.) | शंभू महादेव. |
| ५. | देवता. | देवी. | पार्वती |
| ६. | उपासना. | देवीची | देवीची |
| ७. | पितृदेवता. (यमदेवता घरातील) | आहे | नाही |
| ८. | बळीची प्रथा. | आहे | नाही |
| ९. | गोंदवण | आहे | नाही |
| १०. | रेला(नृत्य)युवा युवतीचे लग्न न झालेले. | आहे | नाही |
| ११. | रेला(नृत्य)लग्न झालेल्या स्त्रियांचे. | आहे | आहे. |
| १२. | रेरेला(नृत्य)लग्न झालेल्या पुरूषांचे. | आहे | आहे |
| १३. | लग्न | लग्न एकाच दिवसात आटोपतात. विधी वेगवेगळा. | लग्नाचा सोहळा पाच दिवस. विधी वेगळा. |
| १४. | सौभाग्य चिन्ह | दमरा (मनगटातले) | काळीपोत मण्यासह गळ्यात वापरतात |
| १५. | सौंदर्य, प्रसाधन कुंकू | लावत नाही | लावतात |
| १६. | सौंदर्य प्रसाधन बांगड्या. | वापरत नाही | वापरतात |
| १७. | लग्न न झालेल्या | दंडामध्ये कडे वापरतात | प्रथा नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| | स्त्रीची खूण | | |
| १८. | लग्नापूर्वी कौमार्याचा भंग होणे. | आहे | नाही |
| १९. | स्त्रियांचे झोपणे | जमिनीवर नेहमी झोपते खाटेवर झोपण्याची प्रथा आहे. | जमिनीवर झोपण्याची प्रथा नाही |
| २०. | रजस्वला स्त्री | गावाबाहेर राहते | घरीच राहते |
| २१. | चोळी, पोलक्याचा वापर | प्रथा नाही. | प्रथा आहे |
| २२. | संभोग | गावाबाहेर जंगलात होतो | घरीच होतो |
| २३. | शौचविधी (स्त्रिया/पुरूष) | उभ्याने किंवा ओणवे होऊन शौच करतात ढुंगण पाण्याने धूत नाहीत. | बसून करतात ढुंगण पाण्याने स्वच्छ करतात. |
| २४. | लघुशंका विधी (स्त्रिया/पुरूष) | उभे राहून करतात | बसून करतात |
| २५. | स्नान(स्त्री-पुरूष) | नग्न स्नान करतात रोज सायंकाळी कुठल्याही पाण्याने. | नग्न स्नान करीत नाही रोज सकाळी उत्तम पाण्याने. |
| २६. | वेणीफणी | नियमित करीत नाही | नियमित करतात |
| २७. | भक्षण | वानर खातात माडिये सर्व भक्षीय आहेत | वानर खात नाही. गोंड सर्व भक्षीय नाहीत. |
| २८. | जेवण | द्रोणात जेवतात | द्रोणात जेवत नाही. |
| २९. | मृतविधी | माडियांचा वेगळा | गोंडांचा वेगळा. |
| ३०. | मृताचे प्रेत | जाळतात-पुरतात. | जाळतात-पुरतात |
| ३१. | समाधी शिळा | प्रथा आहे | प्रथा नाही. |
| ३२. | राहणीमान | सुधारलेले नाही | सुधारलेले आहे. |
| ३३. | शिक्षण | शिक्षणात मागासलेले | प्रगती पथावर |
| ३४. | शेती | करता येत नाही | उत्तम तऱ्हेने करतात. |
| ३५. | लग्नसंबंध | सगोत्रिय होत नाही | सगोत्रिय होत नाही. |

● ● ●

*('इंद्रावतीच्या परिसरातील माडिया जमात' या पुस्तकातून साभार)*

# हलबा आणि हलबा कोष्टी

- शैलजा देवगावकर

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासात अतिप्राचीनकाळी महाराष्ट्राचे पहिले राजे सातवाहन पश्चिमेकडून येणाऱ्या शकांच्या आक्रमणाशी-वांशिक आक्रमणांशी-सतत तोंड देत राहिलेले आढळतात. आर्यांच्या टोळ्या दक्षिणेकडे येत होत्या. जुन्या स्थायिक आर्यांचे नव्यांशी युद्ध होत होते, तसेच शकांच्याबाबत झाले असणार. शक उत्तरेकडून येऊन गुजराथेतून महाराष्ट्रात शिरले. मध्ययुगात रजपूत आणि गुर्जरांचे नाव ऐकू येते. महाराष्ट्रात हे वांशिक आक्रमण आणि वन्य जमातींचे वांशिक मिश्रण झाले असावे.

नदीच्या खोऱ्यातून वसाहती वसवून जंगल काढून लोक जमीन कसू लागले. तेव्हा बऱ्याच जंगली जमाती त्यांच्याकडे काम करू लागल्या आणि या दोन गटांचा एकमेकांशी संबंध आल्यामुळे मिश्र संतती आणि अठरापगड जाती निर्माण झाल्या असाव्यात. सर्व जातींमध्ये अल्प प्रमाणात वन्य जातींचे मिश्रण आढळते व सबंध पूर्व महाराष्ट्रात वन्य जातींचे प्राबल्य व मिश्रण जास्त प्रमाणात आढळते. असे प्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ प्रा. इरावती कर्वे ह्यांचे मत आहे, ते संशोधनांती योग्यच वाटते.

**हळबी किंवा हलबा-उत्पत्तीकथा**

मुख्यत्वेकरून मध्यप्रदेशातील रायपूर, कांकेर हे जिल्हे आणि बस्तर विभाग तसेच विदर्भातील भंडारा जिल्हा आणि काही भाग या ठिकाणी ही जमात आढळते. यांच्या उत्पत्तीसंबंधीची लोककथा मनोरंजक आहे.

एका उरिया राजाने आपल्या शेतातील पिकांचे संरक्षण करण्यासाठी चार कोपऱ्यांना बुजगावणी उभी केलीत. एके रात्री तेथून शंकर-पार्वती जात असताना पार्वतीच्या आग्रहावरून श्रीशंकरदेवाने त्यांना सजीव केले. ते चौघे जण (दोन पुरूष व दोन स्त्रिया) राजाकडे गेले असता राजा म्हणाला-तुम्ही पृथ्वीवर आला आहात तर तुम्हाला जात हवी, तुम्ही शंकरदेवाकडे जा. तेव्हा ते शंकरदेवामागे धावत जाऊ लागले. श्रीशंकराने सांगितले - सारखे हात हलवीत तुम्ही आमचे लक्ष वेधून घेतले; तेव्हा तुम्ही हलबा (To wave) म्हणजे 'हलवा' अशीच लोककथा 'लोधी' लोकांमध्येही आहे.

ऐतिहासिक पाठपुरावा केल्यास असे आढळते की, ओरिसाचा राजा जगन्नाथ महारोगाने पीडित झाला असा कोणीतरी साधूने सांगितल्यामुळे 'सिंहवा' जंगलात आला असता त्याच्याबरोबर जे अनेक लोक आलेत त्यात हलबाही आलेत. राजा जगन्नाथ त्या जंगलातील ओढ्याच्या स्नानाने रोगमुक्त झाला व त्याच भागात राहिला. पुढे तो कांकेरचा राजा झाला. हेच हलबांचे पूर्वज आजही कांकेर भागात हलबांना महत्त्व आहे. 'सिंहाबा' देवळाचे पुजारी हलबाच असतात. राजा जगन्नाथाने बांधलेल्या ह्या देवळाचा 'कपारदार' हलबाच असतो.

बस्तरच्या राजेलोकांशी पण हलबांचा संबंध आहे. बस्तरच्या राजाच्या शोभायात्रेत राजच्या डोक्यावर छत्र धरणारा हलबाच असतो. कानडीत 'हलबार' किंवा हलवारू' म्हणजे पूर्वज किंवा अतिमागास राहणारे (Inhabitants) असा शब्द आहे. बस्तरच्या राजाबरोबर वरंगळ भागांशी आलेल्या संबंधाचे हे प्रतीक असू शकते. डोंगर (Donger) या गावी सापडलेल्या

शिलालेखात दंतेश्वरी देवीचे हे भक्त असून त्यांनी प्रस्थापित राजवटीविरूद्ध बंड केल्याचा उल्लेख आढळतो.

भंडारा जिल्ह्यातील हलबा मात्र आपला संबंध राजपूतांशी जोडतात. त्यासंबंधी प्रचलित लोककथा अशी-उत्तरेत असताना त्यांच्यातील सुंदर मुलीला बादशहाने मागणी घातली. तेव्हा संकटात सापडू म्हणून यांनी चंद्रपूरच्या गोंड राजाचा आश्रय घेतला आणि मग इकडेच जमिनी घेऊन स्थायिक झालेत.

**पोटभेद आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये**

हळबी जमातीचे लोक मध्यम डोक्याचे (डोक्याचा घेर ५२६.२१ मि.मी.) असून, त्यांच्या नाकाच्या लांबी-रूंदीचे सापेक्ष प्रमाण (८५.३७) आहे. तसेच चेहरा व डोके यांच्या रूंदीचे प्रमाण (९३.३८) आहे. हे दीर्घकपाली असून, मध्यम उंचीचे आहेत.

हलबांमध्ये शुद्ध व अशुद्ध प्रकार फार मानतात. त्यांचे बस्तरिया, छत्तीसगडिया, मरेठिया-असे तीन प्रकार आहेत. भंडाऱ्याकडे बारपंगत (शुद्ध) आणि खालपंगत (मिश्र) असे दोन प्रकार आढळतात. बारपंगत इतरांच्या मुली करतात, पण आपली मुलगी आपल्याच जातीत देतात. यांच्यातील कुळांची आडनावे शेजारील सर्व जमातींच्या नावांची आढळतात. वरटी (परीट), भोयर (भोई), मालिया (माळी), बाघेल (राजपूत), एलमा (तेलंगी शेतकरी), तसेच प्राण्यावरून पण नावे आहेत. घोरपतिया (घोडा) मंजूर (मोर), भृंगराज (पक्षी) इ. कुलप्रतीकांची प्रथा असून ते त्या प्राण्यांची शिकार करीत नाहीत. चुकून मारला गेल्यास त्या प्राण्याच्या अंगावर स्वत:च्या कापडाचा तुकडा टाकतात किंवा मातीचे भांडे फोडतात.

**विवाह :** हलबा एकाच गोत्रात विवाह करीत नाहीत. वधू वराच्या घरी मैत्रिणीसह येते. तिचे पाय दुधाने धुतात आणि वर-वधूच्या मध्ये अंतरपाट धरतात. पुरोहित दोन दिवे हातात घेऊन त्याची एक ज्योत करतो आणि मग अंतरपाट खाली करून वर ते कापड वधूच्या अंगावर टाकतो. वधू-वरांच्या कापडाची गाठ बांधून लग्नाच्या जागेला सात प्रदक्षिणा घालतात, वर मग वधूच्या भांगात कुंकू टाकतो व वधू वराच्या डोक्यावर अक्षता टाकते. शेवटी मुलीचे वडील स्वत:च्या ऐपतीप्रमाणें काही वस्तू देतात. हाच लग्नाचा महत्त्वाचा विधी समजतात.

हलबात आतेघरी मुलगी देण्याची प्रथा आहे. आत्याच्या मुलाला इस्टेटीत काही हिस्सा देतात. तसेच त्या मुलाला मानाचे स्थान आहे. वधू-मूल्याची प्रथा आहे. ते अर्थात आर्थिक स्थितीप्रमाणे असते. वधूला अत्यंत मान असतो. 'तू देवी लक्ष्मी आहेस, आम्हाला मदत करायला आली आहेस'-असे समजून वधूची पूजा करतात. लग्न ठरल्यावर घरातील कोणी मरण पावल्यास महुआंच्या झाडाशी प्रथम विवाह होतो व ती मुलगी शुद्ध होते. विधवाविवाहाची प्रथा आहे. घटस्फोट मिळतो आणि घटस्फोटित स्त्री दुसऱ्या नवऱ्याकडून काचेच्या बांगड्या मिळेपर्यंत जुन्या बांगड्या ती फोडीत नाही.

**अंत्यसंस्कार :** हलबात मृताला पुरण्याची पद्धत आहे. नवीन कपड्यात प्रेताला गुंडाळून कॉटवर ठेवतात. प्रेतयात्रेत जळती गोवरी हातात घेतात. पुरण्यापूर्वी प्रत्येक जण आपले जानवे तोडतो. तिसऱ्या दिवशी नदीवर जाऊन क्षीर करण्याची पद्धत आहे. त्याला तिज-नहान म्हणतात. अक्षयतृतीया व पितृपक्ष करण्याची प्रथा आहे.

हलबा जातपंचायत आहे. त्यांच्या प्रमुखाला 'कुर्शी' म्हणतात. कोतवार किंवा नाईक यामधून त्याची निवड होते व न्यायनिवाड्याचे काम तो करतो.

गोंदण्याची प्रथा हलबात आहे. मुलीचे नाक टोचतात. ठराविक डिझाईन काढतात. साखळी गोंदून घेणे स्त्रियांना आवडते. रजस्वला स्त्रीला वेगळ्या खोलीत ठेवण्याची प्रथा आहे. नवऱ्याचे तसेच रात्री मुलाचे नाव घेत नाहीत.

सर जी ग्रिकसन यांनी हलबांच्या संदर्भात एक प्रचलित पुराणकथा सांगितली आहे - श्रीकृष्णाचा भाऊ बलरामने हलांगर तयार केले व त्यानंतर मातीच्या ढिगातून हलधर निर्माण केले. तेच हे 'हलबा'. आपल्या Linguistic Survey of India (Vol. vii) या ग्रंथात हलबांविषयी लिहिताना सर ग्रीअर्सन म्हणतात-भाषाशास्त्रीय पुरावा हलबांना आदिवासी (aborginal) जमात मानतो. त्यांनी आर्यन भाषा व हिंदू धर्माचा स्वीकार केला. त्यांची बोली उरिया, छत्तीसगढी व मराठीचे गमतीदार मिश्रण आहे. बस्तरकडे तेलगू आणि भंडाऱ्याकडे मराठी शब्द जास्त आढळतात.

हिरालाल आणि रसेल यांच्या मताप्रमाणे सिंहावातील मसनदीला पूर्वेला उरिया व पश्चिमेला मराठी भाषा व छत्तीसगढी ही स्थानिक बोली बोलली जाते. त्याचेच मिश्रण असलेली ही 'हलबी' बोली होय.

प्रा. इरावती कर्वे देखील म्हणतात की, सिंहावा जंगलातील हलबा हे मूळ रहिवासी असून गोंड राजांनी त्यांना आपल्या प्रांतात आणून, जहागिरी देऊन ठेवून घेतले. मूळचे हे वन्य लोकच असावेत, असे दिसते.

मानववंशशास्त्राच्या दृष्टीने काहीही मत असो, पण भाषाशास्त्रीय दृष्ट्या हे मूळचे अनार्य, एतद्देशीय असून त्यांनी आर्यभाषा व त्याचबरोबर आर्य धर्म स्वीकारला. हलबी लोकांच्या भाषेत मराठी, उरिया आणि छत्तीसगढी या तीन भाषांचे मिश्रण आढळून येते. शब्द हिंदुस्थानी आणि त्याला प्रत्यय मात्र मराठी लावण्याची हलबी भाषेत पद्धत आहे. उदा. 'मी देखलो नाही' भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून डॉ. अपर्णा झा, डेक्कन कॉलेज, पुणे यांनी हलबी भाषेचा अभ्यास केला आहे. त्या म्हणतात, हलबी भाषेत पुल्लिंग व स्त्रीलिंग असे दोन भेद आहेत. एकवचनापुढे 'मन' हा प्रत्यय लावून अनेकवचन करतात. भूतकाळासाठी 'ल-ब' हे आणि भविष्यकाळासाठी 'दे-ते' हे प्रत्यय आहेत.

**कोष्टी**

नागपूर छत्तीसगढ भागात रेशमी व सुती कापड विणणारे हे लोक मार्कंडेय ऋषीपासून स्वत:ची उत्पत्ती झाली, असे सागंतात, 'कोसा' पासून 'कोष्टी' अशी उपपत्ती मांडण्यात येते. त्यांच्यात 'सालेवार' असा एक विभाग आहे. सालिका (संस्कृत-विणणारा) पासून 'सालेवार' असा शब्द आला असावा. वाघावर आरूढ झालेली सिंहवाहिनी देवीचे हे भक्त.

विवाहाच्या वेळेस सात वेळा वर-वधू भोवती सूत गुंडाळतात. सालेवार लोक मध्यरात्री वधू घरी आणतात. विधवा-विवाहाची पद्धत आहे. गणपती त्यांची आराध्य देवता. फुले, तांदूळ, हळद अर्पण करून पूजा करतात. वैष्णवपंथी पण कोष्टी आहेत. काही कोलीबाबाचे पण शिष्य आहेत. मागाची पूजा करण्याची प्रथा आहे. काही मुस्लिम पण कोष्टी आहेत.

सालेवार स्त्रिया भुवयांमध्ये अर्धचंद्र व दोन गालावर ठिपके गोंदतात. मृताच्या नावाने ५ दिवस सुतक पाळण्याची प्रथा आहे. अविवाहित व्यक्तीसाठी तीन दिवस पाळतात. सर आर. क्रॅड्रैक ह्यांनी नागपूर सेंटलमेंट रिपोर्टमध्ये कोष्ट्यांनी विणलेल्या पांढऱ्या रंगाच्या लाल किनारीच्या रेशमी कापडाची तारीख केलेली दिसून येते. (या ठिकाणी हलबा-कोष्टींच्या संदर्भात कोष्टींची माहिती घेतली असल्याने त्रोटक स्वरूपात दिलेली आहे.)

**हलबा-कोष्टी**

हलबा मुळचे सिंहावा जंगलाचे राहणारे. बस्तरच्या राजांनी त्यांना आपल्या राजसेवेत दाखल करून घेतले. तेथे त्यांनी सैनिकाचा पेशा स्वीकारला. आजही बस्तरच्या राजाचे संरक्षण करणारे हलबाच असतात. गोंड राजाकडे

आल्यानंतर त्यांना जमिनी व जहागिरी मिळाल्या. ते सधन शेतकरी बनले. त्यांच्याचपैकी काहींनी विणकऱ्यांचा धंदा उचलला असावा. नवीन प्रांतात आल्यावर ज्या लोकांच्या संपर्कात ते आलेत, किंवा प्रभावित झाले म्हणा, त्यांचा धंदा त्यांनी उचलला. रसेलचे म्हणण्याप्रमाणे हेच दिसून येते की, हलबांपैकी ज्यांनी विणकरांचा धंदा उचलला ते हलबा कोष्टी (Off shoot of Primitive Halba Tribe).

ते नागपूरच्या परिसरात १०-१५ मैलाच्या प्रदेशात राहतात. एकंदर एकोणीस बीस कुळे त्यांच्यात आहेत. मामे बहिणीशी लग्न करण्याची प्रथा नाही.

हलबा कोष्टी मोठ्या डोक्याचे (डोक्याचा घेर ५३९.६४ मि.मी.) असून दीर्घ-कपाली (सापेक्ष कपाल-प्रमाण ७५-७७) लोक आहेत.

कोष्टी लोकांच्या संदर्भात माहिती देताना सुद्धा हिरालाल रसेल ह्यांनी हलबांचा फार मोठा भाग विणकाम करण्याच्या धंद्यात शिरला म्हणून ते 'हलबा-कोष्टी' म्हणवून घेऊ लागले, असे म्हटले आहे.

भारतीय संस्कृती कोशात काही हलबा विशेषत: नागपूरच्या आसपासचे स्वत:ला 'कुणबी' पण म्हणवून घेतात, असा उल्लेख आढळतो.

**निष्कर्ष -**

हलबा ही आदिवासीत्वाची वैशिष्ट्ये बऱ्याच प्रमाणात टिकवून ठेवलेली जमात आणि हलबा-कोष्टी ही प्रामुख्याने नागपुरात राहणारी व आधुनिकीकरण झालेली जमात आहे. याचा निश्चित स्वरूपात परस्परसंबंध काय असावा, हे अजून वादातीत नाही असे म्हणावे लागेल. वर उल्लेखिलेला रसेल यांचा अंदाज सोडला तर इतर अभ्यासकांचा स्पष्ट निर्वाळा सापडत नाही. दोघांच्या परिमाणांमध्ये फरक असून हलबा कुलचिन्ह, गोंदण, वधूमूल्य इ. वैशिष्टपूर्ण आदिवासी गोष्टी आढळतात. शिवाय शिवाची व देवी दंतेश्वरीची पूजा; ही पण आदिवासी असल्याची आणखी एक खूण म्हणता येईल.

कोष्टी किंवा हलबा-कोष्टी यांच्यात देवदेवता मात्र भिन्न दिसतात. गोंदण प्रतीकात्मकच दिसते. जर ते हलबा या आदिवासी जमातीचीच शाखा असते तर त्यांच्या सांस्कृतीकरणाची प्रक्रिया फारच जलद झाली व ते आपल्या मूळ जमातीच्या बऱ्याच पुढच्या टप्प्यावर जाऊन पोहोचले, असे म्हणावे लागेल. या दृष्टीने हलबा-कोष्टींच्याबाबत अधिक सविस्तर समाजशास्त्रीय आणि मानववंश शास्त्रीय अभ्यास होण्याची अजूनही गरज आहे, असे म्हणावे लागेल.

● ● ●

(पान नं. ३५ वरून)

शेती हा प्रमुख व्यवसाय आता मात्र शिक्षणाकडे ते लोक वळले आहेत.

नृत्य हा त्यांच्या जीवनातील विसावा आणि गाणी ही त्यातील हिरवळ. धार्मिक गीते (सोळा काठी-अठरा ठेमसे) रात्र रात्र गायची ही परंपरागत प्रथा. Village Musician असे त्यांचे सार्थ वर्णन करण्यात येते.

● ● ●

*('वैदर्भीय आदिवासी-जीवन व संस्कृती' या पुस्तकातून साभार)*

# अमरावती जिल्ह्यातील कोरकू

**- राम पाथरकर**

अमरावती जिल्ह्यातील धारणी चिखलदरा म्हणजे महाराष्ट्रातील एक देखणे वनक्षेत्र. डौलदार सागवृक्षांनी बहरलेल्या, ऋतुचक्रात निसर्गाचे विविधरंगी दर्शन घडविणारे, उंच गिरीशिखरे, दऱ्या आणि सिपना, खंडू, डोलार आदि नद्यांनी पुलकीत झालेला तसेच निसर्गाने नयनरम्य साज चढविलेला असा हा परिसर. घटांगच्या उंच गिरी शिखरावर मेळघाट - चिखलदराचे डोंगर आणि घनदाट जंगले यांच्या नयनरम्य. दृश्यांनी मन मोहून जाते. सातपुड्याच्या अंगाखांद्यावरील आणि कुशीतील हा भूभाग.

अशा या दऱ्याखोऱ्यांच्या भागात वसतात ''कोरकू''. कोरकू म्हणजे आगेकूच असा अर्थ काही सांगतात, तर डाल्टन आणि रसेल यांच्या मते ही जमात 'कोल' किंवा 'मुंडा' या जनजमातीशी निगडीत असावी.

महाराष्ट्रात नोंद झालेल्या २०० वन्य जमातीपैकी एक. अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सुमारे २ लाख १७ हजारांच्या जवळपास या जनजमातीचे लोक राहतात. धारणी-चिखलदरा तालुक्यातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे ६० टक्के कोरकू आहेत. गेल्या शतकाच्या शेवटी शेवटी मेळघाटाच्या परिसरात २७,७४८ लोख कोरकू भाषा बोलत असल्याची नोंद आहे. त्यावेळी कोरकूची वस्ती २७,०५१ होती. परंतु कोरकू बोलणारे लोक मात्र जास्त होते. त्यात तेथील निहालांचा समावेश होता.

कोरकू साधारणत: कोल आणि 'संताल' यांच्यासारखे आहेत. कोरकू तसे कृष्णावर्णीय. केस काही प्रमाणात भुरके, नाक थोडे चपटे, ओठ जाड परंतु रुबाबदार. मध्यप्रदेशातील महादेव टेकडीवरील कोरकूपेक्षा मेळघाटचे कोरकू बरेच सुधारलेले आढळतात.

खरे म्हणजे कोरकू मेळघाटचे मूळचे नव्हेतच. निहाल प्रथम या परिसरात होते. कोरकू आले आणि निहाल कमी झाले. कोरकूंची वस्ती वाढली आणि आज निहाल नावाचेच राहिले. एखादे दुसरे घर सापडले तर सापडेल.

कोरकूंचे स्थूलमानाने पुढील वर्ग पडतात. 'मवासी' किंवा 'भोवय', 'बवरिया', 'रूम' आणि 'बोंडोयस'. कोरकू मध्यप्रदेशातील नेमाड, बैतुल आणि छिंदवाडाच्या परिसरातही काही प्रमाणात आहेत. ही जमात रावण वंशातील आहे. कोरकू रावणाचा मुलगा मेघनाथ याची पूजा करतात म्हणून कदाचित त्यांचा संबंध रावणाशी लावण्यात आला असावा. नागपूर विद्यापीठात कोरकूंवर पी. एच. डी. करीत असलेले प्रा. सुभाष राईकवार यांनी सांगितलेल्या एका दंतकथेनुसार ''रावणाने भगवान महादेवाला मनुष्य सृष्टी निर्माण करण्याची विनंती केली असता भगवान महादेव सावलीगढ आणि भवरगड येथे गेले. त्यांनी एक मूठभर माती घेऊन त्यातून पुरूष आणि स्त्री अशा दोन प्रतिमा तयार केल्या व त्यांना सजीव केले. त्यांना ''मुला'' आणि ''मुलाई'' असे नाव दिले. या कोरकू दंतकथेप्रमाणे हेच त्यांचे पूर्वज आहेत.''

### कोरकू संस्कृती

काहीही असले तरी कोरकूंची संस्कृती मात्र हिंदू आहे. १९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकांत मेळघाटामध्ये वन अधिकारी म्हणून काम करीत असलेले मि. बॅलन्टीन यांनी लिहिले आहे की, ''कोरकू हे सूर्य आणि चंद्र पूजक आहेत. शपथ घेताना सूर्य आणि चंद्राचा उल्लेख ते करतात''. देवाला कोरकू बोलीत ''गोमज'' असा शब्द आहे. त्याचा अर्थही सूर्यचंद्रच

होतो. मेळघाटमध्ये बरेच वर्षे मिशनरी म्हणून काम केलेले मि. वार्ड या गोष्टीला दुजोरा देतात. ते म्हणतात ''कोरकूंनी हिंदुप्रमाणे देऊळे बांधली नाहीत अगर मूर्त्याही स्थापल्या नाहीत. गाबाबाहेर दगडावर लाल रंग फासून देव बनविले आहे. डोंगर गोमज, कुल्ल गोमज, मुतीया गोमज, माता गोमज इ. त्यांच्या देवांची नावे आहेत.

कोरकूंमध्ये गोत्र आहेत. प्रचलित दंतकर्थप्रमाणे कोरकूंचे वंशज देवाजवळ जमले असता, त्यांना जवळपास असणाऱ्या झाडाच्या नावांवर अगर प्राण्यांच्या नावांवर गोत्राची नावे दिली. तर दुसऱ्या कथेप्रमाणे एक युद्धात कोरकूंनी माघार घेतली आणि संरक्षणार्थ ते ज्या वस्तूच्या आड लपले तेच त्यांचे गोत्र झाले.

या संदर्भात आणखी एक दंतकथा आहे ती अशी. फार प्राचीन काळी सातपुड्याच्या डोंगरात दैत्याची वस्ती होती. त्यांनी मानवावर हल्ला केला. बरेच लोक मृत्युमुखी पडले. दैत्य निघून गेल्यावर राहिलेल्यांनी मुलाबाळांचा तपास सुरू केला. त्यात एक मुलगा सिवन नावाच्या झाडाखाली बसलेला दिसला. तेव्हा त्याला ते ''बैठे'' म्हणू लागले. मातीच्या ढिगाच्या आड लपलेल्याला ''धापडी'' मातीच्या ढिगावर बसलेला दिसला त्याला ''अखंडे'', पाण्यावर सांपडला त्याला ''मावसी'' म्हणून लागले. त्यांचाच पुढे विस्तार झाला आणि आज कोरकू जमातीत ''बैठे'', ''मोटा'', ''समा'', ''अखंडे'', ''मावसी'', ''कासडा'', ''चिलाटी'', ''धिकार'', ''सोमी'', यासारखी प्रमुख गोत्रे निर्माण झाली.

**कुटुंब पद्धती**

कोरकू जमातीतील कुटुंब पद्धती जरी पुरूष प्रधान तरी स्त्रीला बऱ्याच प्रमाणात मानाचे स्थान. कोरकूतील पितृप्रधान एकत्र कुटुंब पद्धतीमुळे सुमारे १५ ते २५ नातलगांचा एकत्र गोतावळा आढळतो. बाजार-हाट करण्याचा मान साधारणतः महिलांकडे आहे. परंतु काळाच्या चक्रात, पद्धतीत बदल होत आहे. कोरकूत ''सगोत्र'' लग्न करण्याची पद्धत नाही. बाल विवाहही फार मोठ्या प्रमाणात नाही. बहुपतीत्व आणि बहुपत्नीत्वाची पद्धत कमी प्रमाणावर आहे. ''वधू'' प्रधान लग्नपद्धती असल्यामुळे कदाचित बहुपत्नीत्वाची पद्धत नसावी.

कोरकूंतील वधुवर संशोधन पद्धत फार वैचित्र्यपूर्ण आहे. प्रथम वधूची निवड केली जाते. जी युवती पसंत असेल, त्या युवतीच्या घरी उपवर मुलाचे वडील अगर कुटुंबातील प्रमुख व्यक्ती गावातील दोन पंचांसमवेत जातात व मुलीच्या नातलगांच्या समक्ष एक लांब काठी त्यांच्या घरासमोर रोवून निघून जातात आणि दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे पुन:ते जातात. मुलींचे वडील किंवा तिचे नातलग यांनी ती काठी काढून टाकली असेल तर त्यांना ती ''सोयरिक'' पसंत नाही असे समजले जाते. ती न काढल्यास लग्नाची बोलणी सुरू होतात. सर्वसाधारण पद्धतीप्रमाणे कोरकूतही मुलांची आर्थिक परिस्थिती पाहिली जाते.

कोरकूंत एक नाविन्यपूर्ण गोष्ट म्हणजे मुलाला हुंडा दिला जात नाही, तर मुलीला दिला जातो. या हुंड्याला ''पैज'' किंवा ''देज'' म्हणून संबोधिले जाते. ''पेज'' वस्तूच्या स्वरुपात देण्याची पद्धत आहे. त्यात धान्य किराणा आणि काही रक्कम यांचा समावेश असतो. जो मुलगा (वर) ''पेज'' देऊ शकत नसेल त्याला मुलीच्या वडीलाकडे नोकरी करावी लागते. ''पेज''ची बाली पूर्ण होईपर्यंत ही नोकरी करावी आगते. परंतु दरम्यानच्या काळात त्याचा नवरा म्हणून त्या मुलीवर हक्क असतो. या पद्धतीला ''लंझाना'' म्हणतात. जर एखादी कोरकू स्त्री तिच्या जातीचे १० ते २० पुरूष त्या व्यक्तीकडे जातात आणि ''पेज'' मागतात. जर पेज मिळाली नाही तर त्याला मारहाण करतात. दुसरे असे की जर एखाद्या

स्त्रीचा पर पुरूषाशी संबंध आला असेल तर तिला शुद्ध करण्याची कोरकूत पद्धत आहे. मुंडन करून तिला नंदीवर शेण आणि गोमूत्र यांनी स्नान घातले जाते. अशा प्रकारे ती शुद्ध होते. परंतु काळाच्या प्रवाहात या सर्व पद्धती बदलत आहेत, लुप्त होत आहेत. ''वेठ बिगारी'' नष्ट या कायद्यामुळे ''लॅंझाना'' ही गेला आहे.

मृत्युनंतर जमिनीत पुरण्याची पद्धत कोरकूत आहे. मृत्यूनंतर एक वर्षांने ''सिडोली'' करण्याची पद्धत आहे. मृत व्यक्तीला जागे करण्यासारखी ही पद्धत आहे. ''स्मरण स्तंभा'' सारखी लाकडी कोरीव फळी तयार करण्यात येऊन मोहाच्या झाडाखाली तेथे मृताच्या नातलगांचे स्मरणस्तंत्र असेल तेथेच ते राहिले जाते. या स्मरण स्तंभाला ''मुंडा'' असे म्हणतात. हा ''मुंडा'' २ ते ३ फूट उंच आणि सहा इंच रूंद असतो. वरच्या टोकाला भाल्यासारखा टोकदार आकार असतो आणि चार बाजूंनी कोरीव काम असते. कोरीव कामात सूर्य, चंद्र, मनुष्य, घोडेस्वार, गादे इ. चा समावेश असतो. कोरकू ''पितरांचीही'' पूजा करतात. त्या कार्यक्रमाला ''फुलजगनी'' म्हणतात.

कोरकूचे गाव नदीपासून साधारणत: मैल-अर्धा मैल, दूर असते. झोपड्या दोन रांगेत सरळ वसलेल्या असतात. घर अगदी स्वच्छ ठेवण्याची पद्धत आहे. झोपडीसमोर शेणाचा ''सडा'' टाकलेला असतो.

त्यांचा सर्वात आवडता सण म्हणजे होळी. तो ते पाच दिवस साजरा करतात. या होळीच्या दिवसात रस्त्याने जाणाऱ्या व्यक्तीला ते 'फागवा' (पैसे) मागतात. कर्ज काढून सण साजरा करण्याची पद्धत आहे.

जन्म, विवाह, मृत्यू प्रसंगी ते भरपूर मद्यपान करतात. ढोल आणि ''पुंगी'' यांच्या तालावर स्त्री-पुरूष गोलाकार रित्या नाचतात. कोदो कुटकी हे त्यांचे प्रमुख अन्न असले तरी आता ज्वारी, गहू, डाळ यांचा उपयोग ते करतात. अन्न वटून किंवा गंज करून नंतर त्यातून अन्न घेण्याची पद्धत त्यांच्यात आहे. मांसाहारी असले तरी पोपटासारखे पक्षी ते खात नाहीत.

त्यांची वस्ती साधारणत: लाकूड कटाई ज्या भागात होते तेथे जास्त होती. शेतीकडे वळल्यावर मात्र ते काही प्रमाणात सपाट भूभागावर आले. डिंक व मोह गोळा करणे व विकणे इत्यादी व्यवहार ते करतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांच्या जीवनात बरेच मतपरिवर्तन झाले. पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यापासून तर सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. विजेने सुद्धा विकासाचा सांगावा त्यांच्या खेड्याला दिला. ऑईल इंजिन, चक्कीने त्यांच्या जीवनात प्रवेश केला. धारणी-चिखलदरा भागात विद्यालये, महाविद्यालये आली. आश्रमशाळा निर्माण झाल्या. आरोग्याची सोय झाली. सहकारी संस्था झाल्या. मालविक्रीची सोय झाली. कोरकूंची मुले पदवीधर झाली.

विज्ञानाचा मंत्र त्यांच्या जीवनात प्रवेश करीत असून परंपरागतेला ते आता फाटा देत आहेत. प्रगतीच्या पथावरील पाऊलवाट त्यांनी पकडलेली आहे. ती ते मळवित आहेत. 'आदिवासी उपयोजना' त्यांच्यासाठी खास राबत आहे. निरनिराळी महामंडळे त्यांच्या द्वारी पोहचली आहेत.

जुन्या जमान्याचा कोरकू आता लुप्त होत आहे. नवीन मनू तयार होण्यासाठी.

● ● ●

*('लोकराज्य आदिवासी विकास विशेषांक' मधून साभार)*

# झांबरी सुइणीचे डोस

भुजंग मेश्राम

नाये बाय नाये, तस्सं नाये,
गास्सं-
झोपिव, झोपिव कोकोला उपडा
आंगूळ घालण्याआंदी
भगोन्यावानी धुतल्या
बग बग
आंग कस्सं चमकते चांदीवानी
वत वत पानी वत
चांदी जायेल वाहून
चांदणं राहेल अडकून
तू इचाराचं नाहये काडून....
चांदी गेली तू जावं दे
पोरगं, सोन्याहून पिवळं
जीवाहून महाग
जसा कय नर्सरीतला साग
नग नग
माय माय, या इखाला सांभाळ

२:
ताय, मालिस कराची हाये ना?
मंग काय कहाडून हायली
खोब्रेल-बिब्रेल ?
असं तसं नाये बनणार
खोब्रं लावुन्शान पोराला
कराचा हाय का नवसाचा नारोळ ?
कनूगीतलं यरंडेल तेल
समद्र्या तेलामंदी यकदम बेस
आंग मस्त कस्सं
व्हआय पायजे धावंडयावानी चिवट
येक घडंलं,
जलमात पोराला कुटं बी फेक
तो यरंडयावानी
टर्रारून येईल बगं !

३:
पोराचं नाक बगं नाक
त्येला उगंच
धार्धार - टोकदार कराचा परेत्न नगं
फाकव त्येचे गाल
उठोन दिसोदे गालाचा हाड
होठ नगं दाबू आत
ते फूलू दे उबंराच्या फुलावानी

नाक होठ बघून
मनंलं कोण जंगली
तू हभिमानान सांग कि,
निसर्गायवढा स्वर्ग सुंदर नाही !
नियतीचं नाक कापाला येवडी
पुन्हा संधी नाही, बाई-

४:

आताच घे बरं गळ्याची आन
काय बी होवं दे
टोचाचं नाही कोंचे कान।
कान मंजी व्हाघाच्या गुफा
तिथी शिरतांना
वाटला पाहिजे धाक
सत्याचा सदा हुतो विजय
आस्सं काई नाय
त्याची होऊ बी शकते शिकार
आगर बनविता येते पाळिव
सत्याचा पशू मनात जीवंत
ठेवाचा तर
मर्दावर बननू कसं चालेल?
कान टोचून पाळीव प्राणी
झाल्यावर सत्य कसं झेपेल ?
त्याला घन्दाट माणसांच्या झाडीत सोड
राहू दे तापट उक्कट
कानाच्या पाळ्या होवू दे
को-या को-या टच्च
मागचं तोंडी गुप्तधन
पोचवाचं मंजी लख्ख लख्ख ।

५:

पोराचा रंग काळा मातीसारका
ध्यान येरागबाळा
असला तू असू दे
त्याचा काय तोटा ?
अंधारात पेटलं कष्टांचा दिवा
पदन्यातून नाईक पणाची हवा
घासू घासू कातडी
सालटून जाईल....
कर्ज घेतल्यावानी गोरा रंग
कसा काय आला भुमीवर
कुणालेच नाही मालूम बिलूम
मोठ्ठा झाल्यावर
पोरालेच शोध मनाव जबाब
चाटभाट मंतेत,
गोरा रंग म्हणजे सुर्याचा उजेड
काळा मंजे स्थैर्याचा अंधार,
ऊरले सम्दे रंग भंगार
पांढरी माती वाड्याला येते कामी

काळी फकस्त शेती
आता शेती झाली हवा पाण्याच्या
गप्पांचा भाग, शेतकरी विकलांग
पांढऱ्या खतानं शेताचा रंग
ढवळते ढवळा पवळा
पोरगं उजळल उजळू दे
पारगं तळपेल तळपू दे
रंगांच्या जगंत भुलू नाय पर
भुलले काईक एकलव, लिंबाराम
बारसं दुरूस्त करता
पोरगा मांगतो बघ
काळ्या मातीचा हभिमान....

६:

कवतूक माय नाय तू करणार कोण ?
पर कशाच ?
तोंड फोडीचं
परिस्थितीवर कुरघोडींच
पायात कडे नको
कि कमरेला करदोडा
हाताला वाळं नको
कि गळ्यात काळा धागा
बापजाद्यांनी त्याच्या
घालून घेतल्या निष्ठेच्या बेड्या जोहार
सोन्या चांदी परीस
पोराला होऊ दे लोखंडाची वळक
पोराला आशा गोष्टी शिकव
कि घिसड्यावानी त्यानं
तोडाव्या कोंडल्या जंगलाच्या तटातट

७:

नाव काय ठेवू नाव ?
नावात जसं काही नसते
पर बुडाला बरंच असते
दगडधोंड्यात जलमला मनून दगड्या
अंधारात मनून काळ्या
गुरूवारी जलमला म्हणून बस्तऱ्या
हे झालं बक्कळ
एकानं पोराचं नाव ठिवलं कलेक्टर
तवा एकाबी शाळेत नाही परवेश
एकाचा बी बसला नाय इस्वाद
तवा नामांतरासाठी
पुकारला जेहाद
नावातून फेक वनवास

• • •

# सूची


| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी -मार्च | १९८० - जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८० - आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर | १९८० - आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० - आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१ - आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१ - रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८१ - उत्ताराखंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२ - धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२ - जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३ - आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर | १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-आठरा : जानेवारी-जून | १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४ - आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५ - आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५ - जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५ - आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५ - आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६ - जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल-जून | १९८६ - आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६ - आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| अंक तेहतीस : जानेवारी-मार्च | १९८८ - सवलती अपहरणाची समस्या |
| अंक चौतीस : एप्रिल-जून | १९८८ - आदिवासी साहित्य |
| अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती |
| अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून | १९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक |
| अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर | १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन |
| अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून | १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती |
| अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९० - जागतिक आदिवासी |
| अंक चव्वेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक |
| अंक पंचेचाळीस-सेहेचाळीस : जानेवारी-जून | १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक |
| अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या |
| अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती |
| अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून | १९९२ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर | १९९२ - अनुताई वाघ विशेषांक |
| अंक त्रेपन-चोपन्न : जानेवारी-जून | १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव |
| अंक पंचावन-छप्पन : जुलै-डिसेंबर | १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन |
| अंक सत्तावन : जानेवारी-मार्च | १९९४ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक अठ्ठावन्न : एप्रिल-जून | १९९४ - आदिवासी एकता परिषद |
| अंक एकोणसाठ : जुलै-सप्टेंबर | १९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका |

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**